दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2021-2023
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● गुरूवार दि.२९ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● वर्ष ३९ ● अंक ११९ ● किंमत ३ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

# मराठा आंदोलनाची ईडीकडे चौकशीची मागणी

## मनोज जरांगे म्हणाले- माझ्यावर कारवाई महागात पडेल

**मुंबई । वृत्तसंस्था**

मराठा आरक्षणाचे कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील अडचणीत सापडले आहेत. पोलिसांनी जरांगे यांच्याविरुद्ध बीडमध्ये दोन गुन्हे दाखल केले आहेत. दरम्यान मनोज जरांगे यांच्या आंदोलनाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याचे आदेश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज राज्य सरकारला दिले आहेत. यानंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याची घोषणा केली.

**मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांना मोठा त्रास सहन करावा लागेल - जरांगे**

मनोज जरांगे यांनीही राज्य सरकारच्या या कारवाईवर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांना पोलिस तक्रारींबाबत विचारले असता ते म्हणाले, माझ्यावर खटला चालवायचा असेल तर मला काही अडचण नाही, मात्र असे करून ते स्वतःच संकटाला निमंत्रण देतील. लोक संतप्त होतील आणि मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांना परिणाम भोगावे लागतील. आता हा निर्णय त्यांना घ्यायचा आहे. मनोज जरांगे यांनी सांगितले की, माझी कुठेही चूक नाही आणि मला कुठेही गोवले जाऊ शकत नाही. मी तपासात सर्व खुलासे करणार आहे. मी मराठ्यांसाठी काम करत आहे. मी केव्हाही कुठेही चौकशीसाठी यायला तयार आहे. ते म्हणाले, आता त्यांनी विचारले तर मी सलाईनसोबत चौकशीसाठी येईन.

मनोज जरांगे यांनी रविवारी राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर अत्यंत गंभीर आरोप केले. जरांगे यांनीही भाजप नेते फडणवीस यांच्याबद्दल अपशब्द वापरले. त्यांनी फडणवीस यांच्यावर हत्येचा प्रयत्न केल्याचा आरोप केला.

**सरकारसोबत विरोध**

मनोज जरांगे यांच्या आरोपावरून आज महाराष्ट्र विधानसभेत गदारोळ झाला. भाजपचे आमदार आशिष शेलार यांनी मराठा नेते जरांगे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांच्यासह अनेक नेत्यांनी या मागणीला पाठिंबा दर्शवला. त्यानंतर सभापती राहुल नार्वेकर यांनी जरांगे यांच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन करण्याचे निर्देश गृह विभागाला दिले.

**ईडीकडून चौकशीची मागणी**

यावेळी विधानसभेत भाजप आमदार प्रवीण दरेकर आक्रमक झाले. यावर बोलताना दरेकर म्हणाले की, राज्य सरकारने मराठा समाजाला आरक्षण दिल्यानंतरही राज्यात अशांतता आणि अराजकता पसरवली जात आहे. या कटामागील सूत्रधार शोधून याप्रकरणी गुन्हा दाखल करून एसआयटीमार्फत तपास करण्यात यावा. उपमुख्यमंत्र्यांविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या मनोज जरंगे यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी.

तपासात ईडीला सहभागी करून घ्यावे, अशी मागणीही दरेकर यांनी केली आहे. जरंगाच्या सभांसाठी एवढा मोठा पैसा आला कुठून? त्या आर्थिक व्यवहारांची ईडीने चौकशी करावी. उल्लेखनीय आहे की, महाराष्ट्र विधिमंडळाने एक दिवसीय विशेष अधिवेशनात मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण देणारे विधेयक एकमताने मंजूर केले. मात्र मराठा समाजाला इतर मागासवर्गीय (ओबीसी) अंतर्गत आरक्षण देण्याच्या मागणीवर जरांगे ठाम आहेत. याशिवाय मराठ्यांच्या 'रक्ताच्या नात्या'यांनाही आरक्षणाचा लाभ देण्याची मागणी कुणबी करत आहेत. मराठा समाजाला वेगळे १० टक्के आरक्षण देणारे विधेयक न्यायालयात टिकणार नसल्याचे जरंगे यांचे म्हणणे आहे.

## थोडक्यात



### तळगाव खाडीकिनारी तीन अनधिकृत वाळू रॅम्प जमीनदोस्त

**मालवण । वार्ताहर**

कर्ली खाडीपात्रात तळगाव खांदवाडी पेडवेवाडी किनारी अनधिकृत वाळू उत्खनन व वाहतूकसाठी उभारलेले ३ वाळू रॅम्प महसूल पथकाने जेसीबीच्या सहाय्याने जमीन दोस्त केले. तहसीलदार वर्षा झालटे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी सुकळवाड, तलाठी तळगाव, कोतवाल तळगाव पथकाने ही कारवाई केली आहे. यापुढेही अनधिकृत वाळू उत्खनन वाहतूक विरोधात कारवाई सुरूच राहणार असल्याचे महसूल विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

### ओसरगाव येथील बेपत्ता वृद्धाचा मृतदेह आढळला

**कणकवली । वार्ताहर**

सहा दिवसापासून बेपत्ता असलेले शशिकांत लक्ष्मण सावंत (८०, रा. ओसरगाव -कानसळीवाडी) यांचा मृतदेह मंगळवारी सकाळी ११.२७ वा.च्या सुमारास त्यांच्या घरापासून ५०० मीटरच्या अंतरावर असलेल्या शेत जमिनीत मिळून आला. याबाबतची खबर मयत यांचा मुलगा निलेश शशिकांत सावंत यांनी कणकवली पोलिस ठाण्यात दिली आहे.

### वृध्द महिलेची आजारपणाला कंटाळून आत्महत्या

**कणकवली । वार्ताहर**

जानवली -घरटनवाडी येथील कल्पना दिनकर राणे(८०) यांनी आजारपणाला कंटाळून स्वतःला घराच्या पाठीमागील पडवीत आग लावून घेत आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी सकाळी ९ ते दुपारी १ वाजण्याच्या मदतीत घडली. कल्पना राणे यांना मधुमेह व उच्च रक्त दाबाचा आजार होता. त्यांनी आजारपणाला कंटाळून राहत्या घराच्या पाठीमागील पडवीत आग लावून घेत आत्महत्या केली. याबाबतची खबर मोहिनी मंगेश राणे यांनी कणकवली पोलिस ठाण्यात दिली आहे.

### देवगडमध्ये 'अयोध्या' महानाट्य

**देवगड । वार्ताहर**

कणकवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार नितेश राणे यांच्या सौजन्याने देवगड तालुक्यातील जनतेला अयोध्या हे महानाट्य मोफत दाखवले जाणार आहे. हे महानाट्य १ मार्च रोजी सादर केले जाणार आहे. हे महानाट्य सिंधुसंकल्प अकादमी व सागर एन्टरटेन्मेंट यांनी केले असून त्याचे लेखन व दिग्दर्शन केदार देसाई यांनी केले आहे तर निर्मिती प्रणय तेली यांची आहे. पाटणकर ग्राउंड, खरेदी विक्रि संघ पेट्रोलपंपा समोर, देवगड येथे हे महानाट्य होणार असून शुक्रवार दि.१ मार्च २०२४ रोजी, वेळ: सायं. ७:०० अशी ठेवण्यात आली आहे. त्यासाठी मोफत प्रवेशिका घेणे आवश्यक आहेत.

सिंधुदुर्ग समाचार

दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg.samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com

## जरांगेंना अतिरेकी ठरवणार आहात का?

**मुंबई । वृत्तसंस्था**

अर्थसंकल्प सादर करण्यात आल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी विधानभवन परिसरात माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना मनोज जरांगेंच्या आंदोलनाची एसआयटी चौकशी या मुद्द्याबद्दल विचारण्यात आले. त्यावेळी भूमिका मांडली.

जरांगे पाटील यांच्यावर एसआयटी लावण्यात आली आहे. जरांगे पाटलांचे बोलविते धनी हे उद्धव ठाकरे, शरद पवार आणि राजेश टोपे आहेत, असे आरोप भाजपने केले आहेत. या आरोपांवर बोलताना उद्धव ठाकरे यांनी शिंदे सरकारला सुनावले.

**महिलांची डोकी फोडली, छऱ्याच्या गोळ्या घातल्या...**

उद्धव ठाकरेंनी सरकारला कानपिचक्या लगावत भाष्य केले. ठाकरे म्हणाले, बघा, मला असं वाटतं की हे अत्यंत निर्घृण प्रकार आहे. ज्यावेळी जरांगे पाटील हे आंदोलनाला बसले होते. त्या काळात म्हणजे १ ऑगस्ट... इंडियाची बैठक झालेली. त्याच दिवशी संध्याकाळी त्यांच्यावर निर्घृण लाठीहल्ला झाला. अश्रुधुर सोडले. छऱ्यांच्या गोळ्या झाडल्या गेल्या होत्या. महिलांची डोकी फोडली होती. शरद पवार गेले होते. मी सुद्धा गेलो होतो. जणू काही हे अतिरेकी घुसले असं त्यांना वागवलं गेलं, असे म्हणत ठाकरेंनी या प्रश्नाला उत्तर दिले.

**ठाकरेंचा रश्मी शुक्लांना टोला**

शरद पवारांनी जरांगेंना फोन केले, असा आरोपही प्रविण दरेकर यांनी केला. याच अनुषंगाने ठाकरे म्हणाले, आमच्याकडनं त्यांना कुणी किती फोन केले. मला असं वाटतं की, आताच्या ज्या महासंचालक आहेत, त्या यातल्या एक्स्पर्ट आहेत. त्यांच्याकडे जरांगे पाटलांच्या फोनचा रेकॉर्ड असेल,आमच्या ही फोनचा रेकॉर्ड असेल,

**पान ३ वर...**

## तोंडवळी तळाशील रस्त्यासाठी ग्रामस्थांचे 'रास्ता रोको'

**मालवण । वार्ताहर**

गेले वर्षभर पाठपुरावा करूनही तोंडवळी तळाशील रस्त्याचे काम होत नसल्याने ग्राम स्थांनी थेट आचरा - मालवण मार्गावर दीड ते दोन तास ठिय्या करत रास्ता रोको आंदोलन करून बांधकाम विभागाला लक्ष केले. खड्डेमय रस्त्याचा ग्रामस्थांना त्रास होत आहेच, शिवाय सुसज्ज रस्ता नसल्याने पर्यटन व्यवसायावर परिणाम झाला आहे, असा आरोप करत ग्रामस्थांनी आंदोलन स्थळी दाखल झालेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता कमलिनी प्रभू यांना धारेवर धरले. दरम्यान, ग्रामस्थ



आंदोलनावर ठाम राहिल्याने कार्यकारी अभियंता अजयकुमार सर्वगोड यांनी ग्रामस्थांशी दूरध्वनी द्वारे संपर्क साधत रस्त्यासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजुरी घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न होतील असे सांगितले. तसेच येत्या दोन दिवसात तोंडवळी तळाशील रस्त्यावरील खड्डे कार्पेट डांबरीकरणाने बुजविले जातील, असे आश्वासन दिले. दीर्घ चर्चेअंती आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असून आश्वासनाची पूर्तता न झाल्यास पुन्हा आंदोलन छेडू, असे ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे. गेले वर्षभर पाठपुरावा करूनही तोंडवळी तळाशील रस्त्याचे काम होत नसल्याने ग्रामस्थांनी रास्ता रोको करत आंदोलन छेडले. यावेळी तोंडवळी सरपंच नेहा तोंडवळकर उपसरपंच हर्षद पाटील, ग्रामपंचायत सदस्या म नस्वी चव्हाण, सुजाता पाटील, अनन्या पाटील, संजय केळुसकर, दीपक कांदळकर, नाना पाटील, ज्ञानेश गोलतकर तसेच शेकडो ग्रामस्थ सहभागी झाले होते.

आंदोलन सुरू होताच आचरा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील जाधव, मालवण पोलिस उपनिरीक्षक एस.बी. नांदोसकर यांच्यासह आचरा व मालवण पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी दाखल झाले होते. पोलिसांनी

**पान ३ वर...**

## बनावट मनीकंट्रोल ॲपचा वापर करून फसवणूक : सावंतवाडीतील तिघांवर गुन्हा दाखल

**कणकवली । प्रतिनिधी**

शेअर्स खरेदी करून जास्त फायदा मिळवून देतो असे सांगत बनावट मनी कंट्रोल प द्वारे बनावट स्टेटमेंट देऊन कणकवलीतील डॉ. सूर्यकांत नारायण तायशेटे व त्यांच्या पत्नी शुभांगी तायशेटे यांची ३२ लाख ९४ हजार ९३४ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी संशयित आरोपी विवेक विजय पार्टे, वेदिका वैभव पार्टे (दोन्ही शिरोडा सावंतवाडी) व प्रथमेश श्रीकांत राणे (इन्सुली सावंतवाडी) यांच्यावर कणकवली पोलिसात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी डॉ. सूर्यकांत तायशेटे (वय ७५, तेलीआळी रोड कणकवली) यांनी फिर्याद दिली आहे. डॉ. तायशेटे यांच्या दाखल फिर्यादीनुसार हा प्रकार कणकवलीतील आबु तायशेटे हॉस्पिटल येथे १९ जुलै २०२२ ते २७ डिसेंबर २०२३ या दरम्यान घडला. संशयित तिन्ही आरोपीनी एकमेकांच्या संगनमताने फिर्यादी यांना तुम्हाला शेअर्सचा जास्त फायदा मिळवून देतो असे सांगितले. तसेच फिर्यादी यांचा विश्वास संपादन करत त्यांना मनी कंट्रोल प डाऊनलोड करून दिला. तसेच बनावट स्टेटमेंट देखील दिले. या बदल्यात फिर्यादी यांच्याकडून संशयीत यांनी चेक द्वारे पैसे घेतले. मात्र कोणत्याही प्रकारचे शेअर्स खरेदी करून दिले नाहीत. यामध्ये सूर्यकांत तायशेटे यांच्याकडून २० लाख

**पान ३ वर...**

## मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री पदासारख्या जबाबदार पदावर बसल्यानंतर त्या व्यक्तीने जबाबदारीने बोलावे : शरद पवार

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलन दिवसागणिक वेगवेगळे वळण घेताना पाहायला मिळत आहे. मनोज जरांगे पाटील यांची एसटीआयटी मार्फत चौकशी करण्यात यावी, अशा सूचना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वे कर यांनी सभागृहात दिल्या. मनोज जरांगे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून सातत्याने टीका करताना दिसत आहेत. या टीकेला देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत उत्तर दिले. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलनामागे शरद पवार असल्याचा दावा केला जात आहे. याला शरद पवार यांनी



उत्तर दिले. प्रसारमाध्यमांशी बोलताना शरद पवार यांनी सांगितले की, तुम्हाला चौकशी करायची असेल तर अवश्य करा. तुम्हाला वाट्टेल ते करा आणि चौकशी पूर्ण करा.

कर नाही त्याला डर कशाची, आमचा या सगळ्याशी काहीच संबंध नाही. सत्ताधारी लोक म्हणत आहेत की, फोन केले होते, तसे वाटत असेल तर आमचे फोन तपासा आणि मनोज जरांगेंसह त्यांच्या सहकाऱ्यांचे फोन तपासा, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

मनोज जरांगे यांना केवळ एकदाच भेटलो आहे. अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू झाल्यावर त्यांना भेटायला गेलो होतो. आम्हा दोघांमध्ये तेव्हा संभाषण झाले. त्यानंतर आजपर्यंत एका शब्दाने आमचे बोलणे नाही की भेट नाही. असे असतानाही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या दोघांनी माझ्यावर असा आरोप करणं चुकीचे आहे. प्रामुख्याने उपमुख्यमंत्र्यांनी असे बोलायला नको होते, असे शरद पवार यांनी सांगितले. दरम्यान, जबाबदार लोकांनी अशा प्रकारचे वक्तव्य करू नये. मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्रीपदासारख्या

**पान ३ वर...**

## न्हावेली गावातील जुने जीर्ण विद्युत पोल बदलुन विद्युत वाहीनी सुरळीत

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

तालुक्यातील न्हावेली गावातील विद्युत पोल बरीच वर्षे न बदलल्याने जिर्ण झाले होते. याबाबत न्हावेली गावातील ग्राम स्थांनी ही बाब मनसे ग्रामपंचायत सदस्य आणि विभाग अध्यक्ष अक्षय पार्सेकर यांच्या निदर्शनात आणून दिली होती. पार्सेकर यांनी लगेच स्थानिक ग्रामस्थांना घेऊन सावंतवाडी विद्युत महावितरण शाखेत भेट देऊन निवेदन दिले होते. परिणामी महावितरण कंपनीने त्याची दखल घेत जीर्ण झालेले पोल बदलून त्या ठिकाणी नवीन पोल घालण्यात आले. याबाबत येथील ग्रामस्थांनी मनसे पदाधिकारी आणि ग्रामपंचायत सदस्य यांचे आभार मानले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य तथा



मनसे विभाग अध्यक्ष अक्षय पार्सेकर, न्हावेली ग्राम. पंचायत सदस्य आरती माळकर, चेतन पार्सेकर, प्रथमेश नाईक, राज धवण, नवनाथ पार्सेकर, किशोर पार्सेकर, अमोल पार्सेकर,

**पान ३ वर...**

## २८ फेब्रुवारीपासून पुन्हा एकदा वाजणार गणपती वाडी येथील शाळेची घंटा

**देवगड । पांडूशेठ साटम**

अतिशय दुर्गम भागातील आरे या गावातील गणपतीवाडी या जिल्हा परिषद शाळेमध्ये चार विद्यार्थी शिकत होते. परंतु पटसंख्या अभावी पहिली ते चौथीपर्यंत असलेली जिल्हा परिषद शाळा प्रशासनाने अचानकपणे बंद करण्याचा निर्णय घेतला. चार विद्यार्थी काही महिने शिक्षणापासून वंचित राहिले. त्या चार विद्यार्थ्यांपैकी तीन मुलांनी



दोन ते तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या पर्यायी शाळेचा मार्ग निवडला. मात्र चिरंजीव खरात याच्या जिद्दीपुढे प्रशासनाने हात टेकले असून आमदार नितेश राणे यांच्या सूचनेनुसार भाजपा जिल्हा सरचिटणीस संदीप साटम यांनी यशस्वी तोडगा काढल्याने पुन्हा एकदा ५३ दिवसांनी शाळेची घंटा वाजणार असल्यामुळे मुलांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळणार आहे. परंतु चिरंजीव सुनील खरात हा विद्यार्थी गेले दोन महिन्यांपासून स्वतः शाळेचे कुलूप उघडून शाळेमध्ये बसून अभ्यास करायचा. मात्र शिकवण्यासाठी दोन महिन्यांमध्ये एकही शिक्षक या शाळेमध्ये फिरकला देखील नाही. मात्र आता गेले चार ते पाच दिवसांपासून चिरंजीव खरात याच्याकडे शाळेची असलेली चावी शिक्षक घेऊन गेल्यामुळे चिरंजीव खरातला

**पान ३ वर...**

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तौक्ते चक्रीवादळातील वंचित नुकसानग्रस्तांना दिलासा

**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०१९ मध्ये आलेल्या महा भयानक तौक्ते, चक्रीवादळामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किनारपट्टी भागामध्ये तसेच इतर भागात लोकांच्या शेती बागायती तसेच इतर मालमत्तेचे मोठे नुकसान झाले होते. त्यावेळी महाराष्ट्र राज्य सरकारने या चक्रीवादळाने बाधित व नुकसानग्रस्त झालेल्या लोकांना मोठी भरीव आर्थिक मदत देण्याचे जाहीर केले होते. काही नुकसानग्रस्तांना कोट्यवधी रुपयांची भरीव आर्थिक मदत



देण्यात आली होती.

परंतु त्यावेळी काही लोकांना विविध बाबीअंतर्गत मदत मिळणे अजूनही बाकी होते. त्यामध्ये प्रामुख्याने मोठ्या प्रमाणावर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला व सावंतवाडी तालुक्यातील रहीवासी या मदतीपासून वंचित होते व गेली तीन वर्ष त्यांना नुकसान ग्रस्त असूनही भरपाई मिळाली नव्हती. त्याअनुषंगाने ३ वर्षा पुर्वी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी वंचित राहीलेल्या नुकसान ग्रस्त लोकांना मदत मिळण्यासाठी एकुण रक्कम ३ कोटी ९५ लाख २२ हजार २४ रुपयेचा प्रस्ताव शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे सादर केला होता. याबाबत या भागाचे आमदार तथा राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व

**पान ३ वर...**

सिंधुदुर्ग समाचार
।। बुडती हे जण न देखवे डोळा! ।।

# तीन राज्यांच्या निवडणुकांमध्ये यश मिळवल्यानंतरही भाजप अस्वस्थ का?

२०२४ या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशाच्या राजकारणामध्ये नेमकं काय घडतय, कोण निवडून येणार, यापेक्षा जास्त चिंतेचा प्रश्न असेल की देशात सत्तेचे शांततापूर्ण हस्तांतरण होईल का? जनमताचा आदर करत सत्तेचे हस्तांतरण घडणं हे कुठल्याही लोकशाहीमध्ये अपेक्षित असतं या विधानाची आठवण निवडणुकीच्या आधीच यावी अशा घटना सध्या संपूर्ण देशभरामध्ये घडत आहेत. निवडणुका अगदी तोंडावर आहेत आणि त्या आधी विरोधक फोडले जात आहेत, ईडीच्या धाडी सुरू आहेत, शेतकरी आंदोलन दडपण्यासाठी नेत्यांचे, छोट्या-छोट्या माध्यमांचे ट्विटर अकाउंट सुद्धा सरकार ब्लॉक करत आहे. देशातला प्रमुख विरोधी पक्ष म्हणजे काँग्रेसचे खाते ब्लॉक केले जात आहे. झारखंडच्या मुख्यमंत्र्यांना जेलमध्ये टाकले गेले. दुसरीकडे इंडिया आघाडीत राहू नका, नाहीतर तुम्हाला जेलमध्ये जावं लागेल अशा धमक्या येत असल्याचा आरोप आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी केलेला आहे आणि वर्षानुवर्ष ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप भाजपनं केले आहेत त्यांना पुन्हा भाजपमध्ये प्रवेश देऊन पवित्र करण्याचे काम सुरू आहे. या सगळ्याच घटना इतक्या गंभीर आहेत की हे नेमकं काय घडतंय याचा आज विचार करायला हवा आहे. एकीकडे अबकी बार चारसौ पार असा नारा, मोदी की गॅरंटी, अशा घोषणा दिल्या जात आहेत. पण मग पुन्हा सत्तेत येण्याचा आत्मविश्वास दिसण्याच्या ऐवजी एवढी अस्वस्थता का दिसतेय? बहुमताचा आकडा २७२ चा आहे. ३०० जागा आल्या तरी पंतप्रधान तुम्हीच बनणार आहात. पण मग चारशेचा दावा करूनही तुम्ही विरोधकांच्या एकीला एवढं का घाबरता आहात आणि त्यांनी एकत्र लढू नये यासाठीही षडयंत्र का रचले जात आहे?

शेतकरी आंदोलन दडपण्यासाठी सरकार ट्विटरला काही अकाउंट ब्लॉक करण्याचे आदेश देत आहे स्वतः ट्विटरनेच ही माहिती काल अखेर जाहीर केली आहे. भारत सरकारच्या आदेशानुसार आम्हाला ही कारवाई करावी लागते आहे पण आम्ही त्यांच्या या कारवाईशी सहमत नाही फ्रीडम ऑफ स्पीच या विरोधात हे धोरण आहे असं ट्विटरने म्हंटलेल आहे म्हणजे ट्विटरच्या पॉलिसी आहेत त्याचे उल्लंघन होते म्हणून ही कारवाई होत नाहीये तर केवळ सरकारला त्रास होतोय म्हणून हे अकाउंट हटवले जाताहेत. कोर्टात केस चालू असल्याने आम्ही अकाउंटचे तपशील जाहीर करत नाही असे देखील या स्पष्टीकरणामध्ये ट्विटरने म्हटले आहे. सरकारच्या आदेशाची प्रत पण ते जाहीर करणार नाहीयेत पण हे त्यांना न पटणार आहे एवढे दर्शवण्यासाठी ट्विटरने काल ही गोष्ट जाहीर करून टाकली आहे. म्हणजे जे पंतप्रधान एरवी भारताच्या लोकशाही परंपरेचे गुणगान आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर करत असतात त्यांच्याच देशात सरकारी आदेशाने शेतकरी नेत्यांचे अकाउंट ब्लॉक केले जाताहेत.

ज्या शेतकरी नेत्यांच्यासोबत एकीकडे सरकार चर्चा करतेय त्यांचे अकाउंट ब्लॉक करण्याची गरज काय आहे म्हणजे एकीकडे तुम्ही त्यांना चर्चेसाठी योग्य पण समजता आणि दुसरीकडे त्यांचा संदेश लोकांच्यापर्यंत पोहचू नये याचीही धडपडपण करता. शेतकरी आंदोलन मुख्य माध्यमांमध्ये तर फारस दाखवले जात नाहीच आहे. पण गाव सवेरा मंडी पुण्यासारखेचे छोटे ग्राउंडवरचे पत्रकार आहेत ते हे आंदोलन लोकांपर्यंत पोहोचवत आहेत. त्यांचेही अकाउंट ब्लॉक केले गेलेत आणि त्यामुळे ही दडपशाही आहे नाहीतर काय आहे आणि त्याविरोधात कोणालाही बोलावसं का वाटत नाहीय? काँग्रेस पक्षाची सगळी बँक खाती काही दिवसांपूर्वी फ्रिज केली गेल्याचा आरोप पक्षाचे खजिनदार अजय माकन यांनी केला आहे. २०१९ च्या बँक खात्यांचा हिशोब त्यावेळी द्यायचा राहिला आणि त्यावेळी खात्यामध्ये १४ लाख रुपयांची रक्कम कॅश स्वरूपात कशी जमा झाली या कारणावरून ही नोटीस आल्याचं अजय माकन सांगतात. भाजपनं आजवर कधीही इन्कम टॅक्स दिला आहे का असा देखील सवाल काँग्रेसने विचारलेला आहे निवडणूक लढण्यासाठी शेवटी पैसा लागतोच पण जर काँग्रेस इतके खिळखिळे झाले आहे की त्यांना कोणी मत द्यायला तयार नाहीये तर मग त्यांना निवडणूक सुद्धा लढता येऊ नये यासाठी एवढी धडपड का चालू आहे. शिवाय जे जे काँग्रेसी नेते इतके दिवस भ्रष्टाचारी होते त्या सगळ्यांना सध्या पायघड्या घालून भाजपमध्ये आणले जातेय. महाराष्ट्रात २१० आमदारांचा पाठिंबा असलेले सरकार असताना देखील काँग्रेस फोडायची गरज अजूनही भाजपला वाटते.

मागच्या दोन्ही निवडणुकांमध्ये दिल्लीतल्या सात पैकी सात जागा भाजपाने जिंकल्या आहेत त्या पार्श्वभूमीवर दिल्लीमध्ये आप आणि काँग्रेस एकत्रित लढण्याची चिन्हे असताना हा दावा केला जातोय. जर विरोधकांच्या एकीमध्ये काहीच दम नाहिये एक अकेला सबपर भारी असा दावा आहे तर मग या विरोधकांच्या एकजुटीने अस्वस्थ व्हायचं काय कारण आणि ही तोडफोड केवळ दिल्लीमध्ये नाहीये किंवा बिहारमध्ये नाहीये तर आंध्रप्रदेश पासून ते अगदी हरियाणा उत्तर प्रदेश सगळीकडे छोट्या छोट्या पक्षांची मदत सध्या घेतली जातेय. भाजपाच्या काळामध्ये ज्यांनी राज्यपाल म्हणून काम केलं त्या सत्यपाल मलिक यांच्याशी संबंधित ठिकाणावर सीबीआयने जवळपास २५ ते ३० ठिकाणी छापे टाकलेत. हे तेच सत्यपाल मलिक आहेत ज्यांनी पुलवामा घटनेबद्दल काही गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. सत्यपाल मलिक हे शेतकरी आंदोलन असो महिला कुस्तीपटू च्या वरती होणारे अत्याचार असो या सगळ्याबद्दल अगदी रोखठोक बोलत असतात.

सत्ता प्राप्तीसाठी प्रयत्न करणं ही राजकारणाची प्रकृतीच आहे पण सत्ता मिळाल्यानंतर सुद्धा ती भूक न भागणे ही विकृती नाही का. देशामध्ये सलग दोन वेळा भाजप सरकार आलेले आहे पण तरी देखील अजून काँग्रेसच्या लोकांना भाजप आपल्या पक्षामध्ये घेतच आहे आणि हे सगळे भ्रष्टाचार विसरून एक प्रकारे गेल्या चार-पाच वर्षांमध्ये जे आरोप त्यांनी केले होते ते विसरून त्यांचा सन्मान केला जातोय. त्यामुळे ही अशी गरज नेमकी भाजपला का पडली आहे जर चारशे पार हा आत्मविश्वास असेल किंवा मोदी की गॅरंटी यावर तिचा ठाम विश्वास असेल तर मग या सगळ्याला एवढे घाबरण्याचं कारण काय?

# सांस्कृतिक राजधानीला अमली पदार्थांचा विळखा !

मुळशी पॅटर्न फेम अभिनेते रमेश परदेशी यांचा एक व्हिडीओ सध्या सामाजिक माध्यमांवर तुफान चर्चेत आहे. पुण्यातील एका टेकडीवर धावण्यासाठी गेलेल्या परदेशी यांना दोन महाविद्यालयीन तरुणी नशेत झिंगताना दिसल्या. त्यापैकी एकीची नशेमुळे शुद्ध हरपली होती, तर दुसरीच्या तोंडातून अति नशा केल्यामुळे फेस येत होता. राज्याची सांस्कृतिक राजधानी आणि विद्येचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या पुण्यामध्ये नशेच्या आहारी जाणारी तरुण पिढी, पुण्यातील पान टपऱ्यांवर शाळकरी मुलांना सहज उपलब्ध होणारे अमली पदार्थ, विद्यार्थ्यांकडे पालकांचे होत असलेले दुर्लक्ष यासोबतच गेल्या काही महिन्यांत पुण्यातून उघड होणारे अमली पदार्थांचे वेगवेगळे रॅकेट्स यांवर प्रकाश टाकत त्यांनी या सर्व परिस्थितीचा व्हिडीओ तयार करून सामाजिक माध्यमांवर टाकला आहे. मागील ५-६ दिवसांत पुणे पोलिसांनी पुण्यात विविध ठिकाणी छापे मारून जप्त केलेले अमली पदार्थ, या अमली पदार्थांच्या रॅकेटचे राजधानी दिल्ली आणि थेट विदेशाशी असलेले संबंध यांमुळे पुणे चर्चेत असतानाच परदेशी यांचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने पुण्यातील या अमली पदार्थांच्या विळख्यात पुण्यातील तरुणाई सापडत चालल्याचे उघड झाले आहे.

पुणे शहराला हजारो वर्षांचा सांस्कृतिक वारसा लाभला आहे, पुण्यातील अनेक भागात हा वारसा आजतागायत जतन करण्यात आलेला आहे. पुण्यात साजरे केले जाणारे सण आणि धार्मिक उत्सव यानिमित्ताने राज्यातील मराठी संस्कृतीचे दर्शन आपल्याला पुण्यातून होत असते. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म पुण्यातला. पुण्याला अनेक वर्षे महाराजांचा सहवास लाभला आहे. छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचा अटकेपार विस्तार करणारे पेशवेही पुण्यातलेच. राज्याच्या इतिहासात सर्वाधिक वाटा कोणत्या जिल्ह्याचा असेल तर तो पुणे जिल्ह्याचा. पुण्याला शिक्षणाची पंढरी असेही म्हटले जाते. देशभरातून हजारो विद्यार्थी दरवर्षी शिकण्यासाठी पुण्यात येतात. त्यामुळे पुणे हे तरुणाईने नेहमीच गजबजलेले असते. अशा या गुणसंपन्न पुण्याला गेल्या काही महिन्यांपासून दृष्ट लागली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

२०२० मध्ये अमली पदार्थ विक्री प्रकरणात, ललित पाटील याला अटक करण्यात आली होती. ललित पाटीलकडून १६ किलो मेफेड्रोन जप्त करण्यात आले होते. पुण्यातील चाकण भागात अमली पदार्थांची तस्करी करताना ललित पाटीलला बेड्या ठोकण्यात आल्या होत्या. त्यानंतर ललितची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली होती. पाटील स्वतः अमली पदार्थ तयार करत असल्याची माहिती पोलिसांनी त्यावेळी न्यायालयात दिली होती. ससून रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर त्याच्या साथीदारालाही सव्वा दोन कोटी किमतीच्या मेफेड्रोनसह अटक करण्यात आली होती. येरवडा कारागृहात असताना तेथील कर्मचाऱ्यांच्या संगनमताने त्याने पोटाचा विकार झाल्याचा बनाव रचला आणि ससून रुग्णालयात दाखल झाला.

ससून रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना हाताशी धरून त्याने रुग्णालयातून अमली पदार्थांचे रॅकेट चालवायला सुरुवात केली. पहाऱ्याला असलेल्या पोलिसांना हाताशी धरून त्याने २ ऑक्टोबरला रुग्णालयातून पळ काढला. याप्रकरणी ससून रुग्णालयाच्या डीनपासून अनेक वैद्यकीय अधिकारी, पोलीस आणि तुरुंगातील कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले आहे. या रॅकेटचे धागेदोरे अंडरवर्ल्डपासून तर थेट मंत्री-संत्रीपर्यंत जाऊन पोहोचले होते. भावासोबत मिळून ललितने अमली पदार्थ विकून कोट्यवधी रुपयांची माया गोळा केली होती.

ललित पाटील प्रकरण काहीसे शांत होत असतानाच ६ दिवसांपूर्वी पुण्यातील दोन ठिकाणी दोन दिवसांत मिळून सुमारे अकराशे कोटींचे मेफेड्रोन सापडले. पुण्यातील विश्रांतवाडीतील एका लोकवस्तीतीतील मिठाच्या पाकिटांच्या गोदामातून पुणे पोलिसांनी १०० किलो मेफेड्रोन जप्त केले तर कुरकुंभ एमआयडीसीत छापा मारून एका कारखान्यातून ५५० किलो मेफेड्रोन ताब्यात घेतले. या दोन्ही मुद्देमालाची किंमत खुल्या बाजारात सुमारे अकराशे कोटी इतकी आहे. याप्रकरणी पुणे पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. या आरोपींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पुणे पोलिसांनी सांगली आणि दिल्ली येथे जाऊनही अमली पदार्थांचा मोठा साठा जप्त केला आहे. गेल्या आठ दिवसांत पोलिसांनी देशात विविध भागांत छापेमारी करत सुमारे ९७० किलो अमली पदार्थ आतापर्यंत जप्त केले आहे. या रॅकेटमध्ये एका नायजेरियन नागरिकाचाही सहभाग आहे, त्यामुळे या रॅकेटचे विदेशी कनेक्शन असल्याचीही शक्यता वर्तवली जात आहे. पुण्यातील ही आजपर्यंतची सर्वात मोठी कारवाई असून याबद्दल पुणे पोलिसांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

पुण्यातून एकामागोमाग एक जप्त केले जात असलेले अमली पदार्थांचे साठे आणि उघड असलेले त्यामागील रॅकेट्स यातून पुण्याला अंमली पदार्थांचा फार मोठा विळखा पडला आहे हे स्पष्ट होते. काही वर्षांपूर्वी असाच विळखा पंजाबलाही पडला होता. ज्यामध्ये कितीतरी महाविद्यालयीन तरुण-तरुणी नशेच्या आहारी जाऊन बळी पडले होते. कित्येकांचे संसार उध्वस्त झाले होते. कित्येकांच्या घरातील पुढची अख्खी पिढी नष्ट झाली होती. तेव्हापासून पंजाबला 'उडता पंजाब' असे म्हटले जाऊ लागले. या संपूर्ण प्रकरणाची भयावहता दर्शवणारा एक चित्रपटही प्रदर्शित झाला आहे. चिमूटभर अमली पदार्थाची नशा सर्वकाही विसरायला लावते. नशेची 'किक' लागली की ना अभ्यासाची चिंता राहते, ना घरच्यांचे भय आणि ना भविष्याची काळजी. त्यामळे तरुणाईमध्ये या नशेचा प्रचार झपाट्याने होतो. गेल्या काही वर्षांत सांस्कृतिक पुणे शहरांत डिस्को बार आणि पब्सची संख्या कमालीची वाढली आहे. या पब्समध्ये तरुणांना अमली पदार्थ पुरवणाऱ्या टोळ्याही कार्यरत असतात. हे अमली पदार्थ अत्यंत महाग असतात त्यामुळे याममध्ये श्रीमंतांची मुले अधिक प्रमाणात पाहायला मिळतात. ही मुले आपल्या अन्य मित्रमंडळींनाही याची चटक लावतात. एकदा नशा केली की सर्व काही विसरायला होत असल्याने तरुणांना काही दिवसांतच याचे व्यसन लागते. एकदा व्यसन लागले की वेळेत अमली पदार्थ न मिळाल्यास या नशेखोरांचा जीव कासावीस होतो. अमली पदार्थ मिळवण्यासाठी ही मंडळी कोणत्याही थराला जातात, पालकांशी खोटे बोलतात, घरी चोऱ्या करतात, यापैकी काहीच करायला जमले नाही, तर इतरांना लुटायलाही ही मंडळी मागेपुढे पाहत नाहीत. हे अमली पदार्थ नशा करणाऱ्याच्या मेंदूवर भयंकर परिणाम करतात.

ज्यामुळे नशेची तलप आली की नशा करणारे वेडेपिसे होतात, त्यावेळी त्यांना दुसरे काहीच सुचत नाही. त्यावेळी अमली पदार्थ देण्याच्या मोबदल्यात कुणाच्या घरी दरोडा घालण्यास सांगितले तरी ही मंडळी मागेपुढे पहात नाहीत. त्यामुळे अमली पदार्थांच्या मोबदल्यात या तरुणांकडून तस्करी, अपहरण, हत्या यांसारखे भयंकर गुन्हे करून घेणाऱ्या टोळ्याही समाजात कार्यरत असतात. नशेखोरीच्या या विळख्यात दुर्दैवानेही आता मुलीही मोठ्या प्रमाणात सापडू लागल्या आहेत. गेल्या काही वर्षांत प्रदर्शित झालेल्या काही हिंदी चित्रपट आणि ओटीटी प्लॅटफॉर्म्सवरील वेब सिरींमधून खलनायकाला पडद्यावर अमली पदार्थांचे सेवन करताना दाखवण्यात आले आहे, अमली पदार्थाचे सेवन केल्यावर काही क्षणातच त्या खलनायकात एक विलक्षण शक्ती निर्माण होते आणि त्या शक्तीच्या बळावर तो भयंकर विध्वंस करू लागतो अशा प्रकारचे चित्रण म्हणजे अमली पदार्थाची एक प्रकारे जाहिरातच म्हणावे लागेल. अधिक बळ मिळवायचे असेल तर व्यायामादि शक्तीची उपासना करण्याची गरज नाही केवळ चिमूटभर अमली पदार्थ आपल्याला अपरिमित शक्ती बहाल कर शकते हा संदेश अशा प्रकारच्या दृश्यांमधून तरुणांमध्ये जात असल्याने तेही तशा प्रकारचा प्रयत्न करू पाहतात. बलात्कार, खून यांसारख्या गुन्ह्यांमध्ये अधिकांश गुन्हेगार अमली पदार्थांचे सेवन करून गुन्हा करतात असेही निरीक्षणातून सिद्ध झाले आहे.

पुण्यासारख्या सांस्कृतिक जिल्ह्याला ड्रग्जचा पडलेला विळखा पुण्याच्या भावी पिढीसाठी अत्यंत धोकादायक आहे. पुण्यातून कोट्यवधींचे अमली पदार्थ शोधण्यात पुणे पोलिसांना यश आले असले, तरी आतापर्यंत किती प्रमाणात अमली पदार्थ पुण्यात पसरवले गेले आहे याचे उत्तर कोणाकडेच नाही. आज रमेश परदेशी यांना साताऱ्यातून शिकण्यासाठी पुण्यात आलेल्या दोन मुली टेकडीवर अमली पदार्थांच्या नशेत झिंगताना दिसल्या. उद्या कदाचित आपली मुलेही अशा प्रकारे कुठेतरी झिंगताना सापडू शकतात.

देशाचे भवितव्य घडवणारी पिढीच अशी नशेच्या आहारी जाऊन आपला नाश ओढवून घेऊ लागली, तर आर्थिक महासत्ता होऊ पाहणाऱ्या देशाचे भवितव्य काय असेल ? त्यामुळे आता सर्वात मोठी जबादारी ही आज पालकांची आहे. आपली पौगंडावस्थेतील आणि तरुण मुले मुली बाहेर मित्र मैत्रिणींसोबत जाऊन काय उद्योग करतात, घरी वेळेत येतात का, पालकांकडे किंवा नातेवाईकांकडे अधिक पैशांची मागणी करतात का, घरी त्यांच्या वागण्यात काही बदल झालेला नाही ना, याकडे पालकांना अधिक लक्ष द्यावे लागेल. मुलांना दिली जाणारी अधिक मोकळीक हेही मुलांचे नशेखोरीला बळी पडण्याचे एक कारण आहे. यामुळे आपली मुले अमली पदार्थांच्या विळख्यापासून वाचवायची असतील, तर त्यांना वेळ देणे, त्यांच्याशी सुसंवाद साधने आणि त्यांच्यावर लक्ष देणे आदी कामे पालकांना करावी लागतील.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# वायंगणी समुद्रकिनारा ऑलिव्ह रिडले कासव महोत्सव

पहाटेची वेळ आणि फेब्रुवारी महिना टाटा बायबाय करत आला होता. हिवाळा जाऊन उन्हाळ्याच्या सुरुवातीचा काळ. पण कोकण किनाऱ्यावरील या निवांत गावामध्ये अजूनही थंडावा आसमंतात दरवळतच होता. सकाळची वेळ असली तरीही अनेक गाड्या पार्क झालेल्या दिसल्या. काहीजण टॉर्च घेऊन लगबगीने किनाऱ्याकडे निघालेले दिसले. लोकांनी गर्दी केलेली दिसली. वायंगणी समुद्रकिनारा - वायंगणी हे भारतातील महाराष्ट्र राज्यातील दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील एक गाव आहे.ऑलिव्ह रिडले कासव यांच्या संवर्धनासाठी प्रसिद्ध असलेला वायंगणी समुद्रकिनारा पर्यटकांसाठी आता आकर्षक ठरत आहे वनविभाग सावंतवाडी वनपरिक्षेत्र कुडाळ कासव जत्रेच्या निमित्ताने वायंगणी गाव सहयोगातून हे सुंदर चित्र आपणास पाहण्यास येत आहे अनुभवण्यास येत आहे.

वेंगुर्ला तालुक्यातील वायंगणी समुद्रकिनारी संरक्षित केलेल्या ऑलिव्ह रिडले प्रजातीच्या पिल्लांची सिंधुदुर्गात या हंगामातील पहिलीच बॅच गुरुवारी घरट्यातून बाहेर आली. या सर्व पिल्लांना वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या व स्थानिकांच्या उपस्थितीत नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. या किनारपट्टीवर ऑलिव्ह रिडले दुर्मीळ कासवांची अंडी संरक्षित करण्यात आली असल्याने ऑलिव्ह रिडले कासवांच्या पिल्लांना पाहण्याची पर्यटकांना पर्वणी असणार आहे.

तालुक्यातील वायंगणी सुरक्षित समुद्र किनाऱ्यावर समुद्री कासव प्रजनन काळात अंडी लावण्यासाठी किनाऱ्यावर येतात. ही अंडी कासवमित्र सुरक्षित ठिकाणी संरक्षित करून सभोवताली कुंपण करून समुद्राच्या पाण्यापासून तसेच कुत्रे, घार, कावळे, खेकडे यांसारख्या हिंस्र प्राण्यांपासून ४५ ते ५५ दिवसापर्यंत संरक्षण करतात. अड्ड्यातून बाहेर पडलेल्या पिल्लांना वनविभागाच्या सहकार्याने नैसर्गिक अधिवासात समुद्रात सोडून या दुर्मीळ कासवांना जीवदान देतात.वायंगणी समुद्रकिनारी येथील कासव मित्र तसेच ऑलिव्ह रिडले संस्थेचे सहकारी यांच्या उपस्थितीत या सर्व पिल्लांना सुखरूप समुद्राच्या पाण्यात सोडून जीवदान देण्यात आले.काही दिवसात पर्यटकांसाठी मोठी पर्वणी शांत व निसर्गरम्य या समुद्रकिनारी कासव अंड्यांचे संवर्धन केले जात असल्याने. येत्या काही दिवसातच किनारपट्टीवर ऑलिव्ह रिडले कासवांच्या पिल्लांना पाहण्याची पर्यटकांना मोठी पर्वणी असणार आहे. तर समुद्रकिनारी भागातील स्थानिकांनी या ऑलिव्ह रिडले जातीच्या समुद्री कासवांच्या संरक्षण आणि संवर्धन कार्यात वनविभागास सहकार्य करण्याचे आवाहन वनविभागामार्फत करण्यात येत आहे. बऱ्याच मोठ्या प्रमाणात रहिवासी सहकार्य करतही आहेत.

ऑलिव्ह रिडले कासवांची दुर्मिळ प्रजाती देशात ओरिसा, गोवा आणि कोकणात आढळते. त्यांची पैदास डिसेंबर ते मार्च या कालावधीत होते.या निमित्ताने मऊशार वाळूवर स्वच्छंदीपणे धावणारी कासवांची पिल्ले समुद्राच्या लाटांवर हेलकावे घेण्यासाठी सुरू असलेली त्यांची पळापळ ..

कासवांच्या लिलांचे दर्शन याची देही, याची डोळा घेण्याची संधी निसर्गप्रेमी पर्यटकांना उपलब्ध होत असते. कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील वायंगणी गावात गेली काही वर्षे ऑलिव्ह रिडले कासवांच्या संवर्धनाचे काम करत आहेत. दरवर्षी नोव्हेंबर ते मार्च या महिन्यात ही कासवे किनाऱ्यावर येऊन अंडी घालतात. एकावेळी ५० ते १०० अंडी असतात. या अंड्यांपासून बनवलेल्या पदार्थांना पंचतारांकित हॉटेल्समध्ये खूप मागणी असते.त्यामुळे अंडी चोरीला जाऊ नयेत तसेच कुत्रे किंवा अन्य प्राण्यांपासून त्यांचे भक्षण होऊ नये म्हणून सुहास तोरसकर त्यांचे सहकारी वायंगणी ग्रामस्थ विशेष काळजी घेतात. कासवांची अंडी ज्या ठिकाणी घातली आहेत तिथे जाळी बसवली जातात.



५५ ते ६० दिवसांनंतर वाळूतून पिल्ले बाहेर आल्यावर त्यांना वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली समुद्रात सोडले जाते.किरात ट्रस्ट, वायंगणी ग्रामस्थ यांचे नियोजन, म्याग्रू फाऊंडेशन आणि लुपिन फाऊंडेशनच्या सहकार्याने दरवर्षी या गावात कासव जत्रा हा निसर्ग उपक्रम २०१२ ते २०१८ पर्यंत राबविला गेला.कासवांच्या पिल्लांचा जन्मसोहळा पाहण्याबरोबरच मांडवी किनाऱ्यावरची डॉल्फिन सफर ,खाडीतील मासेमारीचा अनुभव ,वायंगणी जंगल ट्रेल, कासव संवर्धनाचे स्लाईड व फिल्म शो ,पक्षी-प्राणी तज्ञांशी गप्पा ,खाडीतील सफर, दशावतार ,अस्सल मालवणी पदार्थांची मेजवानी ,सांस्कृतिक कार्यक्रम या कासव जत्रेच्या निमित्ताने आयोजित करण्यात येतात. सन २०१९ मध्ये शासनाने हा उपक्रम व्यापक प्रमाणावर राबविण्यात येण्यासाठी ग्रामपंचायतीचला पर्यटन महोत्सव राबविण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला. सन २०१९ मध्ये पर्यटन महोत्सव-कासव जत्रा हा उपक्रम वायंगणी किनाऱ्यावर राबवण्यात आला होता.

भारतात ओरिसाच्या समुद्रकिनारी ऑलिव्ह रिडले कासव लाखोंच्या संख्येने अंडी घालण्यासाठी येतात.फार मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या कासवांच्या संख्येने या घटनेला मोठी प्रसिद्धी मिळाली आहे. हा किनारा खास कासवांसाठी सुरक्षित झाला आहे. सततच्या या प्रयत्नामुळे कासवांचा नैसर्गिक जन्मदर जो जेमतेम चाळीस ते पन्नास टक्के होता तो आता सुमारे ७० टक्क्यांवर जाऊन पोहोचला आहे. ग्रामस्थांच्या सहकार्या प्रमाणे देवगड येथील प्राणी मित्र प्राध्यापक दप्तरदार यांचेही या कामात मार्गदर्शन मिळते .कासव जत्रा या निसर्ग उपक्रमात मुंबई-पुणे,नाशिक महाराष्ट्र तसेच भारतभरातून असंख्य निसर्गप्रेमी पर्यटकांनी आतापर्यंत हजेरी लावली आहे. वायंगणी गावात पर्यटकांच्या राहण्याची व्यवस्था इथल्या स्थानिक घरांमध्येच केली जाते. नोव्हेंबर ते मार्च या दरम्यान कासवांच्या पिल्लांचाजन्म सोहळा आपणाला देखील पाहण्याची इच्छा असेल तर इथे पूर्वनियोजित संपर्क करून आपणही आपली सहल आयोजित करू शकता. ऑलिव्ह रिडले कासवांच्या इवल्याशा पिल्लांना समुद्रात सोडण्याचा सोहळा पाहायला ही पर्यटक मंडळी आलेली होती. तिथं किनाऱ्यावरच जाळी लावून आतमध्ये कासवांच्या घरट्यांतील अंडी सुरक्षित ठेवण्यात आली होती. आणि आज त्यातून किती पिल्ले अंडी फोडून आयुष्याचा श्रीगणेशा करायला तयार आहेत हे पाहायला पर्यटक उत्सुक होते.

निसर्ग संवर्धन, पर्यावरण पूरक पर्यटन आणि यांच्या मिलाफातून स्वयंरोजगार याचं उत्तम उदाहरण म्हणजे कोकण किनाऱ्यावरील ऑलिव्ह रिडली कासवांचे संवर्धन आणि त्याममध्ये असलेला स्थानिकांचा सहभाग. ऑलिव्ह ग्रीन रंगाच्या कवचा मुळे त्यांना हे नाव दिलं गेलं असावं. पूर्ण वाढ झाल्यानंतर ही कासवे साधारणपणे २ फूट लांब आणि ५० किलो वजनाची होतात. ही कासवे मांसाहारी असतात. यांचे खाद्य म्हणजे जेलीफिश, मासे, त्यांची अंडी, कालवं, गोगलगायी खेकडे इत्यादी. त्यांचे संपूर्ण आयुष्य खोल समुद्रात जाते आणि अन्न शोधणे व प्रजननन यासाठी हजारो किलो मीटरचा प्रवास ही कासवे आयुष्यभर करतात. वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे अंडी घालण्यासाठी मादी त्याच किनाऱ्यावर येते जिथं अंड्यातून ती पिल्लू म्हणून बाहेर पडलेली असते. ५-७ दिवसांच्या कालावधीत अनेक माद्या ठरलेल्या किनाऱ्यावर येतात आणि सुमारे अर्धा फूट खोल खड्डा खणून एकावेळी ८० ते १२० अंडी घालतात. तज्ज्ञ असे मानतात की अंडी फोडून बाहेर पडलेल्या १ हजार पिल्लांपैकी एकच प्रौढ कासव म्हणून जगते. ही पिल्ले ४५-६० दिवसांच्या अंतराने अंड्यांतून बाहेर पडतात आणि मग समुद्र किनाऱ्यावरून काही मीटर्स चा प्रवास करून सागरात आपल्या आयुष्याचा श्रीगणेशा करतात. किनाऱ्यावरून पाण्यात जाणारी पिल्ले कोल्हे, कुत्रे, खेकडे, तरस, शिकारी पक्षी यांच्या भक्षस्थानी पडतात. त्यामुळे अनेकदा मादी एका हंगामात दोनदा अंडीही देते.ऑलिव्ह रिडले कासवांचे संवर्धन खूप मोठ्या प्रमाणावर ओडिशा राज्याच्या किनाऱ्यावर होते. महाराष्ट्रात हे प्रमाण तितकं मोठं नसलं तरीही सह्याद्री निसर्ग मित्र संस्थेने लावलेल्या संवर्धनाच्या रोपट्याचा आता वृक्ष झाला आहे हे नक्की.

आता हे काम गावखडी, आंजर्ले, कोळथरे, केळशी अशा ठिकाणीही वाढले आहे. मादीने अंडी घातल्यानंतर ही अंडी जाळीने संरक्षित केलेल्या हॅचरीत आणून ती दोन महिने जपावी लागतात आणि मग पुढं यातून पिल्ले बाहेर येतील त्याप्रमाणे काळजीपूर्वक समुद्रात सोडावी लागतात. गावकरी हे काम आनंदाने करतात. यासाठी किनाऱ्यावर रात्रभर गस्त घालण्याची मेहनतही घ्यावी लागते. पण यातून पर्यावरण पूरक पर्यटनाला चालना मिळत आहे ही एक मोठी सकारात्मक गोष्ट आहे.समुद्रात सोडलेल्या पिल्लांचे फोटो काढत असताना अनेकदा सूचना देऊनही फ्लॅश सुरूच असतात.

हे बंद ठेवण्याची सक्त ताकीद इथे कासव मित्र यांनी केली आहे शिवाय पिल्लांना मातीतून प्रवास करत समुद्राकडे सुरक्षित जात आहे ना याची ही दक्षता घेतली जाते. पिल्ले समुद्रात १५-२० मिनिट गेल्या नंतरच पर्यटकांनी समुद्रात प्रवेश करू शकता अशीही ताकीद दिली जाते. कारण पिल्ले समुद्रकिनारी लाटेमार्फत पुन्हा येतात आणि त्यावर कोणाचाही पाय न पडावा कोणत्याही पिल्लाला हानी न व्हावी या दृष्टीने लक्ष दिले जाते. शिवाय आपले हि पर्यटकांचे कर्तव्य आहे निसर्गाला काही हानी होईल असे काही वर्तवणूक होता कामा नये. धन्यवाद ..!

**सौजन्याने सौ.रुपाली शिंदे**

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार (मुख्य आवृत्ती सिंधुदुर्ग)** : संस्थापक, संपादक कै.प्राचार्य मुकुंदराव कदम (MA,LLB), मालक, मुद्रक, प्रकाशक : ॲड.रूपाली मुकुंद कदम डांगे (BSL,LLB,MCA) R.N.INo. 43711/85 संपादक : ॲड रूपाली मुकुंद कदम डांगे मुद्रणस्थळ : न्यु विक्रम मुद्रणालय, एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, येथे छापून प्रकाशन स्थळ/कार्यालय : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६६०२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६६०२, उपसंपादक : विक्रम मुकुंद कदम, कार्यकारी संपादक मंडळ : प्रा. ऊज्वला कदम राठौर, डॉ.शर्मिला कदम राजपुत, ई मेल-कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी व जाहिरातीसाठी संपर्क : rupasamachar@gmail.com, बातमी व फोटोसाठी संपर्क sindhudurg.samachar@gmail.com सिंधुदुर्ग-फोनः (०२३६७) २३१९२५, फॅक्स-२३२१०१ वेंगुर्ला : बी.के.रोड फोन : २६३७४६, मुंबई/पुणे फोन : ९८२२९७९७३२, रत्नागिरी : गाळा नं. ३८, २ रा मजला, कोल्हापूर अरिहंत अर्पाटमेंट फोन : (०२३१) २५२३००५ मुंबई संपर्क कार्यालय सत्यवान बिल्डींग पडवळनगरए ठाणे (वेस्ट)४००६०४

पान १ वरून

## जरांगेंना अतिरेकी ठरवणार आहात का?

देवेंद्र फडणवीसांनी तो घ्यावा. आणि समजा आम्ही जरांगे पाटलांच्या मागे आहोत, तरी देखील त्यांचं असं काय चुकतंय हे त्यांना तुम्ही सांगण्याचा प्रयत्न का करत नाही. कुणी आंदोलनाला उभं राहिलं तर त्याच्यावर तुम्ही त्याला गुन्हेगार ठरवायचं. ज्या पद्धतीने उत्तरेतील शेतकरी एक-दीड वर्षापूर्वी आंदोलनाला उतरले होते. त्यांना अतिरेकी ठरवण्यापर्यंत मजल गेली होती. आता जरांगे पाटलांना तुम्ही अतिरेकी ठरवणार आहात का? हा एवढाच भाग राहिला आहे. म्हणजे कुणी न्याय हक्कासाठी उतरायचंच नाही, असे म्हणत ठाकरेंनी शिंदे सरकारवर हल्ला चढवला. ठाकरे पुढे म्हणाले, ठीक आहे. एखाद्याची मागणी कदाचित चुकीची असेल किंवा पूर्ण करता येत नसेल, तर त्याला विश्वासात घेणं हे राज्यकर्त्यांचं काम असतं. त्याला गुन्हेगार ठरवणं हे राज्यकर्त्यांचं काम नसतं. असा राज्यकर्ता बिनकामाचा असतो. मला मारण्याचा कट रचला गेला आहे, असा आरोप जरांगेंनी केला आहे. याकडे माध्यमांच्या प्रतिनिधींनी ठाकरेंचं लक्ष वेधलं. त्याला उत्तर देताना ठाकरे म्हणाले की, त्याची एसआयटी चौकशी करा. आम्ही कुठे काय म्हणतोय. मूळात जरांगे पाटलांनी जी मागणी केली आहे, त्या मागणीबद्दल ती सोडून त्यांच्यामागे का लागताहेत? त्यांच्या मागण्यांच्या मागे लागा ना, असा टोलाही ठाकरेंनी लगावला. जर जरांगे पाटलांच्या मागे आम्ही आहोत असा आरोप तुम्ही करत असाल, तर एक दीड महिन्यापूर्वी गुलाल कुणी उधळला होता? फटाके कुणी फोडले होते? जर तुम्ही त्यांची एसआयटी चौकशी लावत असाल, तर माझं म्हणणं आहे की, एसआयटी चौकशी चिवटपणाने करा. मध्ये सोडू नका, असा चिमटा ठाकरेंनी शिंदे-फडणवीसांना काढला.

## तोंडवळी तळाशील रस्त्यासाठी ग्रामस्थांचे 'रास्ता रोको'

ग्रामस्थांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र बांधकाम विभागाचे अधिकारी येईपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, असा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला होता. रास्ता रोकोमुळे आचरा व मालवण च्या दिशेने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. यावेळी पोलिसांनी ग्रामस्थांना रस्त्यावरून बाजूला होण्यास सांगितले असता ग्रामस्थ आणि पोलिसांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली.

## बनावट मनीकंट्रोल ॲपचा वापर करून फसवणूक : सावंतवाडीतील तिघांवर गुन्हा दाखल

१९ हजार ०३४ व त्यांची पत्नी हिच्याकडून १२ लाख ७५ हजार असे एकूण ३२ लाख ९४ हजार ९३४ एवढ्या रकमेची फसवणूक झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. संशयित आरोपीच्या विरोधात भादवी कलम ४०६, ४२०, ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास कणकवली पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक शरद देठे करत आहेत. दरम्यान सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अजून काही जणांची अशा प्रकारे या पद्वारे फसवणूक झाल्याची चर्चा आहे. यामधील कणकवलीतील व कुडाळ मधील देखील काही नावे चर्चेत आहेत.

## मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री पदासारख्या जबाबदार पदावर बसल्यानंतर त्या व्यक्तीने जबाबदारीने बोलावे : शरद पवार

एखाद्या जबाबदार पदावर बसल्यानंतर त्या व्यक्तीने जबाबदारीने बोलायला हवे. त्यांचे वक्तव्य हे पोरकटपणाचे आहे. एखादी जबाबदार व्यक्ती इतके खोटे बोलताना यापूर्वी पाहिले नाही. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांपासून आजच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत अनेक मुख्यमंत्र्यांचे वर्तन पाहिले आहे. परंतु, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे अशा प्रकारचे वर्तन कधी पाहिले नव्हते, अशी टीका शरद पवारांनी केली.

## न्हावेली गावातील जुने जीर्ण विद्युत पोल बदलुन विद्युत वाहीनी सुरळीत

दीपक बरकुटे, भावेश पार्सेकर, प्रसाद आरोंदेकर, दिपक पार्सेकर, तुकाराम पार्सेकर, मयंग पार्सेकर, धनेश नाईक, दत्तप्रसाद पार्सेकर, अजय पार्सेकर, भूषण पार्सेकर, वासुदेव पार्सेकर, सुदन पार्सेकर, उदय परब, रूपेश पार्सेकर, राकेश न्हावेलकर, सावळाराम न्हावेलकर, सौरभ पार्सेकर, कुणाल पार्सेकर, आदी मनसे कार्यकर्ते उपस्थित होते.

## २८ फेब्रुवारीपासून पुन्हा एकदा वाजणार गणपती वाडी येथील शाळेची घंटा

शाळेच्या आवारामध्ये बसूनच अभ्यास करावा लागत होता. आमदार नितेश राणे यांनी सांगितलं की, जर आमच्या विद्यार्थ्यांशी भविष्याबद्धल कोण खेळत असेल तर आम्ही सहन करणार नाही. या प्रकाराची संपूर्ण माहिती घेऊन आणि संबंधित शिक्षिकेवर कारवाई कशी करता येईल? याकडे लक्ष देईन. जेणेकरून विद्यार्थ्यांचा नुकसान होऊ नये.यासाठी आम.नितेश राणे यांच्या सूचनेनुसार भाजपा जिल्हा सरचिटणीस संदीप साटम, माजी सरपंच महेश पाटोळे, उपसरपंच रत्नदीप कांबळे,संदीप कदम,बंटी जेठे, सत्यवान पाटोळे,भाऊ कदम तसेच चिरंजीव ची आई आरे गणपत वाडी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये जाऊन वस्तुस्थिती जाणून घेत त्यावर यशस्वी तोडगा काढण्यात त्यांना यश आले. गटशिक्षणाधिकारी यांच्या लेखी पत्रानंतर २८ फेब्रुवारीपासून पुन्हा एकदा गणपती वाडी येथील शाळेची घंटा वाजणार असल्या मुळे पालकांसह विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.मात्र तोडगा काढूनही आरे गणपती वाडी जिल्हा परिषद शाळा सुरू न झाल्यास पंचायत समितीवर धडक मोर्चा आणू असा इशारा जिल्हा कार्यकारणी सदस्य संदीप साटम यांनी दिला आहे. गटशिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की,गणपतीची वाडी येथील शिक्षकेची बदली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किंजवडे शाळा नंबर एक येथे ३ जानेवारीपासून करण्यात आली होती. परंतु प्रशासकीय कारणास्तव सदरची पर्यायी व्यवस्था २७ फेब्रुवारी रद्द करण्यात येत असून २८ फेब्रुवारी पासून आपण आपली मूळ शाळा आरे गणपतीची वाडी येथे कामकाज करायचे आहे.आपले रजा कालावधीत शिक्षक उपलब्ध नसल्याने पालक विद्यार्थ्यांना पूर्वकल्पना देऊन शाळा बंद ठेवावी शाळा किंजवडे नंबर एक येथील सद्यस्थितीत कार्यरत स्वयंसेवक सदर शाळेचे कामकाज पूर्ण अधिकाऱ्याने करतील दीर्घ आजारी शिक्षक खोत यांच्यासाठी अजून एक स्वयंसेवकाची स्थानिक पातळीवर नेमणूक तात्काळ करण्यात यावी असेही गटशिक्षणाधिकारी यांनी पत्रकात म्हटले आहे.

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तौक्ते चक्रीवादळातील वंचित नुकसानग्रस्तांना दिलासा

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याजवळ सदर वंचित नुकसानग्रस्त लाभार्थ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली होती. सदरची मागणी व त्याची गांभीर्यता लक्षात घेता मागणी तात्काळ मंजूर करुन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तौक्ते चक्रीवादळातील बाधित वंचित नुकसानग्रस्त रहिवाश्यांसाठी रक्कम ३ कोटी ९५ लाख २२ हजार २४ रुपये एवढे अनुदान मंजूर केले असून या भागातील नुकसानग्रस्त रहिवाश्यांना दिलासा दिला आहे. ही नुकसानभरपाईची रक्कम मिळण्यासाठी जिल्हा नियोजन समिती सदस्य सचिन वालावलकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यानुसार २१ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्याला अनुदानाची रक्कम प्राप्त झालेली आहे. व लवकरच नुकसान भरपाईची रक्कम सदर वंचित लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.

# दक्षिण कोकणची काशी आंगणेवाडी येथील श्री देवी भराडी यात्रेची तयारी अंतिम टप्प्यात

**मसूरे । वार्ताहर**

दक्षिण कोकणची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व नवसाला पावणाऱ्या आंगणेवाडी येथील श्री भराडी देवीची जत्रा अवघ्या चार पाच दिवसांवर येऊन ठेपली आहे. यावर्षी सदर जत्रोत्सव शनिवार दिनांक २ मार्च रोजी होत आहे. यादिवशी पहाटे ३ वाजल्या पासून एकूण ९ दर्शन रांगाद्वारे भाविकांना आई भराडी मातेचे दर्शन घेता येणार आहे. मंदिर परिसरात यात्रोत्सवाची जय्यत तयारी सुरु झाली आहे.

आंगणे कुटुंबीय, आंगणेवाडी विकास मंडळ आणि शासकीय प्रशासकीय यंत्रणांकडून जत्रा सुरळीत पार पडण्यासाठी काम चालू आहे. व्यापारी बांधवांनी दुकाने थाटण्यास प्रारंभ केला असून विविध व्यावसाईकांची आंगणेवाडी मध्ये लगबग वाढल्याचे दिसून येत आहे.

जसजशी दुकाने सजायला लागली, तसतसा आंगणेवाडी परिसर फुलून जात आहे. जत्रोत्सवापूर्वीच आंगणेवाडीत भक्तिमय वातावरण तयार झाले आहे. सामाजिक संस्था व विविध पक्षांकडूनही विविध सामाजिक उपक्रम, शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. मंदिर व मंदिर परिसरातील विद्युत रोषणाई व फुलांची आरास लक्षवेधी ठरणार आहे. आंगणेवाडी जत्रोत्सवात लाखोंच्या संख्येने भाविक येतात. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून भाविकांना देवीचे दर्शन घेण्याबरोबरच अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

सामाजिक संस्था तसेच राजकीय पक्षांकडून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. सरबत वाटपाच्या कार्यक्रमापासून ते आरोग्य तपासणीपर्यंतचे अनेक सेवाभावी उपक्रम यात्रेत राबविले जातात. यावर्षी भाविक गर्दीचा उच्चांक होणार असल्याने भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देताना त्रुटी दूर केल्या जात आहेत. दर्शन रांग लाकडी पूल आणि इतर रांग व्यवस्था काम अंतिम टप्प्यात आले आहे.

हीआयपी मार्ग अशी ओळख असलेला मसुरे आंगणेवाडी मार्गावरील दत्त घाटी मध्ये स्ट्रीट लाइट व्यवस्था चोख आहे. त्यामुळे सदर मार्ग अधिक सुरक्षित होणार आहे. देवालयालगत असलेले दोन ट्रान्सफॉर्मर शाळेच्या मागे एकाच ठिकाणी केल्याने यामुळे सदर परिसर अधिक सुरक्षित होणार आहे.

पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी आंगणेवाडी येथे पोहोचणारे रस्ते दर्जा उन्नती करून प्राधान्याने पूर्ण केल्याने भाविक आभार मानत आहेत. जत्रेदिवशी रात्री व्हीआयपी मार्गावरील मसुरे देऊळवाडा दत्त घाटी येथे होणारी वाहतूक कोंडी रोखण्यासाठी रात्रीच्या वेळी जादा वाहतूक पोलीस याठिकाणी तैनात करणे आवश्यक आहे.

**जादा रेल्वे सोडण्याची मागणी**

आंगणेवाडी जत्रोत्सवास मोठ्या प्रमाणात मुंबईकर चाकरमानी कोकणात येतात. या चाकरमान्यांना जिल्ह्यात येण्यासाठी रेल्वेचा प्रवास अधिक सोईस्कर आहे. २ मार्च पूर्वी सर्व रेल्वे गाड्यांचे आरक्षण फुल्ल झाले आहे. काही गाड्यांचे वेटिंग तिकीट सुद्धा उपलब्ध नाही आहेत. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने जादा गाड्या सोडण्याची मागणी चाकरमान्यांमधून होत आहे. एकूणच जत्रा पूर्व तयारीने बऱ्यापैकी वेग घेतला असून आंगणे ग्रामस्थ लाखो भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज होत असल्याचे चित्र आंगणेवाडीत दिसून येत आहे.

यात्रा कालावधीत यात्रा स्थळातील कणकवली आणि मालवण स्टँडकडून मंदिरा पर्यंत अपंगांसाठी जाण्याची सोय यावर्षी प्रथमच रिक्षाद्वारे करण्यात येणार आहे. असे मंडळाचे अध्यक्ष भास्कर आंगणे यांनी स्पष्ट केले आहे.

पाण्याच्या टाक्या दुरुस्ती आणि नव्याने उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, इंटरनेट, बस सेवा, पोलीस यंत्रणा, आरोग्य यंत्रणा मुबलक आणि सुरळीत होण्यासाठी जिल्हाधिकऱ्यांमार्फत संबंधित कर्मचाऱ्यांना योग्य सुचाना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील पहिलेच सुसज्ज असे सुलभ प्रसाधनगृह पालक मंत्री मा. रवींद्र चव्हाण यांच्या प्रयत्नांतून पुर्ण झाले आहे.. याचा लाभ भाविकांना होणार आहे.

कोकण रेल्वे यावर्षी दिनांक १ मार्च रोजी कुर्ला रेल्वे स्टेशन ते मडगाव रेल्वे स्टेशन पुन्हा ३ मार्च रोजी रिटर्न अशी आंगणेवाडी यात्रा स्पेशल जादा रेल्वे सोडण्यात येणार आहे. याची तिकिट बुकिंग सुरु आहे. त्याचा लाभ भाविकांना घेता येणार आहे.

आंगणेवाडी येथील श्री देवी भराडी मातेचा वार्षिकोत्सव हा उत्सव २ व ३ मार्च असा दोन दिवस साजरा होणार आहे. जेणेकरून दुसऱ्या दिवशीही आंगणेवाडीत येणाऱ्या सर्वांना देवीचे दर्शन सुलभतेने घेता येणार आहे.

यात्रेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच ३ मार्च रोजी भाविकांना कमी गर्दीमध्ये मातेचे दर्शन सुलभरीत्या होण्यास मदत होणार आहे.

श्रीदेवी भराडी मातेच्या भक्तांनी यात्रा काळात रांगांचाच लाभ अवश्य घ्यावा असे आवाहन आंगणे कुटुंबियांकडून करण्यात आले आहे.

## थोडक्यात



### रत्नागिरी शहरातील कॉंक्रिट रस्ते ऑगस्टमध्ये पूर्ण करण्याचे लक्ष्य

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

शहरात सुरू असलेल्या रस्ता कॉंक्रिटीकरणाचे काम १५ ऑगस्टपूर्वी पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्याचवेळी काही ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण सुरू असून, ती कामे १५ मेपर्यंत पूर्ण होणार आहेत. रत्नागिरी शहरात कॉंक्रिटच्या ४ मार्गिकांच्या रस्त्यांचे काम वेगाने सुरू आहे. ९६ कोटी रुपये खर्च करून साळवी स्टॉप ते मारुती मंदिर आणि मारुती मंदिर ते नाचणे मार्गातील रस्त्याच्या एका मार्गिकचे काम अंतिम टप्प्यात आहे. १५ ऑगस्टपर्यंत कॉंक्रिटचे रस्ते पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले असल्याचे रत्नागिरी नगर परिषदेच्या बांधकाम विभागाचे अभियंता यतीराज जाधव यांनी सांगितले. शहरातील काही रस्ते खराब झाले होते. या रस्त्यांचे डांबरीकरण केले जात आहे. हे डांबरीकरणाचे काम १५ मे पर्यंत पूर्ण होईल, असा विश्वास बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी व्यक्त केला आहे.



### पळसंबची श्रुती परब सुवर्णपदकाची मानकरी

**मालवण । वार्ताहर**

मुंबई येथे राहणारी पळसंब गावठाणची सुकन्या श्रुती संदिप परब हिने राज्य स्तरीय स्पर्धेत 'किक बॉक्सिंग फेडरेशन कप ' ५० किलो ग्रॅम वजनीय व १८ वर्षे वयोगटीय मुलींच्या संघातुन सुवर्णपदक मिळवले आहे. तिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.बारामती येथे आयोजित 'किक बाक्सिंग फेडरेशन कप' स्पर्धेत राज्यातील स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत सिंधुदुर्गाची मान अभिमानाने उंचावणार्या पळसंब गावची कन्या व महाराष्ट्र मुंबई येथील कु. श्रुती संदिप परब हिने सुवर्णपदक पटकावले. तिच्या यशा बद्दल पळसंब माजी सरपंच चंद्रकांत गोलतकर, जेष्ठ अभिनेते गिरीधर पुजारे यांनी अभिनंदन केले आहे.

# भंडारी हायस्कूलच्या आठवडा बाजाराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मालवण । वार्ताहर**

भाजी घ्या लाडू घ्या थंडा घ्या कुरकुरे घ्या अशा आरोळ्या देत ग्राहकांना आकर्षित करून आपल्या मालाची विक्री करणारे विद्यार्थी आणि त्यांना शिक्षक, पालक व ग्राहक नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देत उत्साहपूर्ण वातावरणात आज येथील भंडारी ए. सो. प्राथमिक शाळेचा आठवडा बाजार बहरला.



येथील भंडारी ए. सो. प्राथमिक शाळेमार्फत बाल आनंद मेळावा अंतर्गत गेली अनेक वर्ष आठवडा बाजार भरविण्यात येत आहे. यंदाही हा बाजार प्रशालेच्या मैदानावर भरविण्यात आला. विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान, खरेदी विक्री याचे ज्ञान मिळावे, भविष्यात त्यांना उद्योग व्यवसाय करण्याची प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा आठवडा बाजार भरविण्यात येतो. या बाजाराचे उदघाटन भंडारी हायस्कुलचे मुख्याध्यापक हणमंत तिवले यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. त्यावेळी संस्थेचे लोकल कमिटी सदस्य दशरथ कवटकर, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक भूपेश गोसावी, शिक्षक राधा दिघे, श्री. लोकेगावकर, पूर्वी गोवेकर, श्री. बोवलेकर, माजी मुख्याध्यापिका प्रज्ञा कांबळी, आर. डी. बनसोडे, नंदकिशोर मळेकर, केशव भोगले आदी तसेच विद्यार्थी व पालक उपस्थित होते. या आठवडी बाजारात विद्यार्थ्यांनी लाडू, बिस्किटे, जिलेबी, काजुगरसहित मालवणी मेवा आदी विविध खाद्य पदार्थ, भाज्या व फळे, कडधान्ये, नारळ, पाणी बॉटल, फालुदा व सरबत आदी शीतपेये, कांदाभजी असे अनेक पदार्थ आणि वस्तू विक्रीस मांडल्या होत्या. तसेच बॅनर लावून व आरोळ्या देऊन आपल्या मालाची जाहिरातही केली. यासाठी विद्यार्थ्यांना पालकांचे सहकार्य लाभले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, हायस्कुलचे विद्यार्थी व ग्राहकांनी या बाजारात खरेदी करून उत्तम प्रतिसाद देत मुलांना प्रोत्साहन दिले.

# दुचाकी अपघातात कोलगाव येथील युवक ठार

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

गाडी चालवत असताना अचानक हृदयविकाराचा झटका आल्यामुळे कोलगाव येथील तरूण ठार झाला. ही घटना काल रात्री साडेबारा वाजता आकेरी-हुमरस परिसरात मुंबई - गोवा महामार्गावर घडली. शैलेश वाडीकर (वय ३९) असे त्या तरूणाचे नाव आहे. त्याला अधिक उपचारासाठी कुडाळ येथे दाखल करण्यात आले.



परंतु उपचारापूर्वीच त्याचे निधन झाले असे वैद्यकीय अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्याचा मृतदेह ओरोस येथे असून शवविच्छेदनानंतर सावंतवाडीत आणण्यात येणार आहे.

असे त्यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले. शैलेश हा आपल्या एका मित्रासोबत काही कामानिमित्त कुडाळ येथे दुचाकी घेवून गेला होता. तेथून परतत असताना ही घटना घडली. गाडीवरील ताबा सुटल्याने गाडी रस्त्याच्या बाजूला आदळली. यातच त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. मात्र हृदयविकाराचा झटका आल्याने हा प्रकार घडला असावा, असा वैद्यकीय अधिकाऱ्यांचा अंदाज आहे. त्याच्या पश्चात पत्नी, मुले, आई, वडील असा परिवार आहे. कोलगाव मारुती मंदिरा समोर त्यांचे भुसारी दुकान आहे. तो ते चालवत होता. तो अतिशय कष्टाळू आणि प्रामाणिक होता. त्यामुळे त्याच्या लोकसंपर्क दांडगा होता. त्याच्या मृत्यूची बातमी कळताच अनेकांनी हळहळ व्यक्त केली.

# छत्तीसगड मधून हरवलेल्या राजकुमार मरकाम युवकास केलं वडीलांच्या स्वाधीन

**कणकवली । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते व उबाठा सेनेचे निष्ठावंत शिवसैनिक महेश देसाई यांचे प्रसंगावधान राखतछत्तीसगड मधून हरवलेल्या मुलाला नातेवाईकांशी भेट घडवून आणली आहे.छत्तीसगड मधून हरवलेल्या राजकुमार मरकाम या युवकाला वडिलांच्या स्वाधीन केले. महेश देसाई नेहमीप्रमाणेच बेळणे येथील आपल्या बागेत जात असताना एक तरुण त्यांना जानवली येथे भुकेल्या अवस्थेत दिसला. त्यांनी त्याला हॉटेल मधे खाऊपिऊ घातले व सहज चौकशी केली असता सदर तरुण राजकुमार मरकाम, बैरामपूर छत्तीसगड येथील असल्याचे समजले. तो खूप दिवसांचा भुकेला होता व घरातून कोणालाही न सांगता निघून आला होता. त्याला



फोन नंबर विचारला असता त्याने आपल्या भावाचा नंबर सांगितला. त्यावर महेश देसाईनी फोन लावला असता त्याच्या भावाने तो फोन उचलला, त्यांना सुखःद धक्का बसला.

सदर मुलाला त्याचे नातेवाईक उत्तर प्रदेश वाराणसी पर्यंत शोधून गेले होते. त्यांनी महेश देसाई चे आभार मानले व आपण येईपर्यंत सदर मुलाला आपल्या कडे ठेवून घेण्याची विनंती केली . कारण छत्तीसगड येथून येईपर्यंत यायला तीन दिवस लागणार होते. महेश देसाई नी सदर मुलाला तीन दिवस आपल्या बागेमधे ठेवून घेतले. परवा त्याचे वडील व भाऊ आले असता ओळख पटवून त्यांच्या ताब्यात दिले.

मुलाला बघताच त्याच्या वडीलांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. त्यांनी महेश देसाईचे आभार मानले. महेश देसाई च्या प्रसंगावधानाने एका मुलाची त्याच्या कुटुंबियांसह भेट घालून दिल्यामूळे त्यांचे सर्वच स्तरातून कौतूक होत आहे.

# वाट न ठेवल्याने रस्त्यावर पाण्याची कोंडी होऊन घाट पुन्हा कोसळण्याची शक्यता

**आंबोली । वार्ताहर**

आंबोली येथील घाटात ऐअरटेल कंपनीची केबल टाकताना घाट रस्तावर दरीकडे पाणी जाण्यास कोणतीही वाट न ठेवल्याने रस्त्यावर पूर्णपणे पाण्याची कोंडी होऊन घाट पुन्हा कोसळण्याची शक्यता आहे. सार्वजनिक बांधकाम अधिकारी विजय चव्हाण यांनी ठेकेदार राऊळ आणि मुकादम राठोड याना काम बंद करण्याच्या सूचना देऊनही काम बंद केले नाही.त्यामुळे संबंधित कामाची चौकशी होऊन ठेकेदारावर कारवाई करावी ,अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनिल चव्हाण यांनी केली आहे. आंबोली घाटात दरीच्या बाजूने कठड्याला लागून केबल टाकून कॉंक्रीट घालण्यात येत आहे. मात्र कठड्याच्या मोरीच्या मध्ये एक फुटाची गॅप ही रस्त्यातील पाणी खाली जाण्यासाठी आहे मात्र या ठिकाणी हलगर्जी पणा करून ठेकेदाराने पूर्ण घाटात दरीच्या बाजूने कॉंक्रीट घालून पाणी जाण्यासाठी वाटच ठेवली नसल्याने रस्त्यात पाणी तुंबून पुन्हा घाट रस्ता कोसळू शकतो तसेच रस्ता देखील कमी झाला आहे. संबंधित केबल टाकताना पाणी जाण्यासाठी अंतर ठेवलेले नाही तसेच ही केबल कठड्यावरून गेली असती आणि वरून कॉंक्रीट घातले असते तर कोणताही धोका नहोता त्यामुळे हलगर्जी पणा या ठिकाणी दिसून येतो. काल बांधकाम विभाग अभियंता चव्हाण यांना बोलावून पाहणी केली असता त्यांनी संबंधित ठेकेदार आणि मुकादम याला काम बंद करा असे सांगितले असताना देखील त्याने काम बंद केले नाही त्यामुळे पावसाळ्यात धोकादायक परिस्थिती आहे.

**ग्रामपंचायत कार्यालय, सावडाव** तालुका - कणकवली, जिल्हा - सिंधुदुर्ग

जाक्र ग्रापंसा/२५७/२०२४ दिनांक २७/२/२०२४

**निविदा सुचना**

मा.सरपंच ग्रामपंचायत सावडाव ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग यांजकडून ग्रा.पं.सावडाव हद्दीतील खाली नमूद कामांसाठी नोंदणीकृत मक्तेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा सावडाव ग्रामपंचायतकडे दिनांक ०७/०३/२०२४ या मुदतीत सायं. ०५.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळता ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील.

| अ.क्रं. | कामाचे नाव | निधीचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|
| १. | सावडाव खांदारेवाडी स्मशानभूमी रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे. | २५/१५ | ९९९७९०/- | ९९९८/- | १००/- |
| २. | सावडाव जाधववाडी गटार दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग (ग्रा.प.) | ८३३२३/- | ८३३/- | १००/- |
| ३. | सावडाव कदमवाडी स्मशानभूमी स्मशानशेड बांधणे. | १५ वा वित्त आयोग (ग्रा.प.) | ३२४२१५/- | ३२४२/- | १००/- |
| ४. | सावडाव जाधववाडी स्मशानभूमी स्मशानशेड बांधणे. | १५ वा वित्त आयोग (ग्रा.प.) | ३२४२१७/- | ३२४२/- | १००/- |
| ५. | नेवरेकर वाडी पायवाट करणे. | दलित वस्ती | ४९९८१९/- | ४९९८/- | १००/- |
| ६. | काटेवाडी पायवाट करणे. | १५ वा वित्त आयोग (ग्रा.प.) | ५६९८०/- | ५६९/- | १००/- |

टीप-
सदर कामाच्या अटी व शर्ती तसेच कामाचे अंदाजपत्रक ग्रा.पं. कार्यालयात पहावयास मिळेल.

सही /- ग्रामपंचायत
ग्रामपंचायत सावडाव
ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग

सही /- सरपंच
ग्रामपंचायत सावडाव
ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग

## थोडक्यात



### सिंधुदुर्ग पोलिसांनी कसून चौकशी करावी, आमदार नितेश राणें

**ओरोस । प्रतिनिधी**

बांग्लादेशी नागरिकांचे सिंधदुर्ग जिल्ह्यामध्ये अजून त्यांचे साथीदार आहेत का? याबाबत चौकशी करावी अशी मागणी केली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा व आरोंदा या दोन ठिकाणी शुक्रवारी २३ फेब्रुवारी रोजी पोलिसांनी छापा मारून १० बांग्लादेशी नागरिकांना अटक केली आहे. त्याबद्दल भाजपा आमदार नितेश राणेंनी सिंधुदुर्ग पोलिसांचे पत्र पाठवत कौतुक केलं आहे. तसेच बांग्लादेशी नागरिकांचे सिंधदुर्ग जिल्ह्यामध्ये अजून त्यांचे साथीदार आहेत का? याबाबत चौकशी करावी अशी मागणी केली आहे. बांग्लादेशी नागरिकांची कसून तपासणी करून त्यांनी भारतात प्रवेश कसा केला? या कामी त्यांना कोणी मदत केली? 'त्यांचे साथीदार कोण? सिंधदुर्ग जिल्ह्यामध्ये अजून त्यांचे साथीदार आहेत का? त्याचप्रमाणे बेकायदेशीररीत्या भारतात प्रवेश करण्यामागे त्यांचा हेतु काय होता? या दृष्टीने तपास करून जनतेच्या मनातील निर्माण झालेली भिती दूर करावी, याबाबत कसून चौकशी करावी अशी मागणी आमदार नितेश राणेंनी जिल्हा पोलीस अधिक्षकांकडे केली आहे.

### दुचाकींच्या अपघातात महिला जखमी

**राजापूर । वार्ताहर**

भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने दुसऱ्या दुचाकीला दिलेल्या धडकेत एक महिला जखमी झाली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात पावस - आडिवरे मार्गावर १४ फेब्रुवारी रोजी झाला. या अपघातानंतर धडक देणारा दुचाकीस्वार पळून गेला. या प्रकरणी नाटे सागरी पोलिस स्थानकात नोंद करण्यात आली आहे. या अपघाताची फिर्याद सहायक पोलिस फौजदार उत्तम पिलणकर यांनी दिली आहे. संदीप सहदेव मोंडे हे १४ रोजी पत्नी व मुलासह दुचाकी क्रमांक (एमएच ०८, एव्ही २२२७) घेऊन पावस बाजारपेठ येथून आडिवरे येथे जात होते. नवेदर बस थांब्याजवळील एका हॉटेलसमोर भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने मोंडे यांच्या दुचाकीच्या हँडलला धडक दिली. त्यामुळे मोंडे यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि दुचाकी पडली. यामध्ये त्यांच्या पत्नी जखमी झाल्या आहेत.

### बोगद्यात रेल्वेची धडक बसून तरुणाचा मृत्यू

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

कोकण रेल्वे मार्गावर रत्नागिरीनजीक करबुडे येथील रेल्वे बोगद्यामध्ये अज्ञात तरुणाचा मृतदेह आढळून आला आहे. त्याचा मृत्यू रेल्वे गाडीची धडक बसल्याने झाला असल्याचा प्राथमिक अंदाज ग्रामीण पोलिसांनी वर्तवला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना रविवार दि. २५ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.१२. वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. रविवारी दुपारी करबुडे बोगद्यात रेल्वे ट्रॅकची पाहणी करत असताना कर्तव्य बजावणाऱ्या ट्रॅकमॅनला तेथील बोगद्यामध्ये ३० ते ३२ वर्ष वय असलेल्या तरुणाचा मृतदेह आढळून आला. याची माहिती ग्रामीण पोलिसांना दिली.

### स्पीड ब्रेकर ठरताहेत जीवघेणे

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

शहरातील मुंबई-गोवा जुन्या हायवेवर सावंतवाडी शहरात घालण्यात आलेले स्पीड ब्रेकर अपघाताला कारणीभूत ठरत आहे. दोन दिवसात अनेक दुचाकी चालकांना त्या ठिकाणी अपघात झाला असून सिलींडर गाडीतून खाली पडल्याचा प्रकार घडला आहे. त्यामुळे याबाबत योग्य ती भूमिका घ्यावी, अशी मागणी माजी नगरसेवक सुरेश भोगटे यांनी बांधकाम अधिकाऱ्यांकडे केली आहे.

# पाडलोसमध्ये लागलेल्या आगीतून राहते घर, बैलजोडी वाचविण्यात यश : जळाऊ लाकूड साठ्याचे मात्र नुकसान

**बांदा । वार्ताहर**

पाडलोस माडाचेगाळू येथे मंगळवारी दुपारी ४ वाजताच्या दरम्यान शॉर्टसर्किटमुळे आग लागून तुकाराम गावडे यांचे नुकसान झाले. वाऱ्याचा वेग असल्याने आग घरापासून अवघ्या चार फूट अंतरावर आली होती.



मात्र ग्रामस्थांच्या सतर्कते मुळे आग रोखण्यात आली अन पुढील अनर्थ टळला. तर केणीवाडा येथे लागलेल्या आगीतून बैल जोडी वाचविण्यात यश आले. ₹लीमाडाचेगाळू येथे सलग चौथ्यावर्षी शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना घडली. विद्युत वाहिन्या एकमेकांना घर्षण होऊन शॉर्टसर्किट झाले व त्याची ठिणगी सुक्या गवतावर पडली. दुपारची वेळ असल्याने वाऱ्याच्या झोकात आग घराजवळ पोहोचली. घरातील मंडळी झोपी गेली होती. परंतु आग लागल्याचे लक्षात येताच ग्रामस्थांनी तात्काळ धाव घेतली व घरापासून अवघ्या चार फुटावर आग रोखण्यात आली. यावेळी परिसरात असलेला डंपर तात्काळ बाजूला करण्यात आला. आगीत तुकाराम गावडे यांचे दोन टेम्पो जळाऊ लाकूड मात्र जळून खाक झाले. सदर आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. आग विझविण्यासाठी चंद्रकांत नाईक, सखाराम गावडे, मुकुंद गावडे, चंद्रकांत शेटकर, गुणाजी गावडे, जानकी गावडे, अनुजा गावडे, दुर्गावती गावडे, शेवंता राऊळ यांनी शर्तीचे प्रयत्न केले.

केणीवाडा येथे दुपारच्या सुमारास अचानक बागायतीत धूर येत असल्याचे गौरेश पटेकर यांना दिसले. त्याच बागायतीमधील झाडाखाली बैल जोडी बांधून ठेवण्यात आली होती. गौरेश यांनी जीवाची परवा न करता आगीतूनच धाव घेत आपल्या बैल जोडीला वाचविले. तसेच परिसरात आग लागल्याचे सांगताच ग्रामस्थांनीही धाव घेतली. विहिरीच्या पाण्याने कळशीतून पाणी ओतून आग विझविण्यात यश आले.

सदर आगीचे कारण समजू शकले नाही. आग विझविण्यासाठी गौरेश पटेकर, अमोल नाईक, सप्रेम परब, अंकुश पटेकर, हर्षद परब, आनंद पटेकर, बाबी कोरगावकर, रोहन परब, प्रचला पटेकर, दिव्यांनी पटेकर, दिनेश पटेकर आदी ग्रामस्थांनी प्रयत्न केले.

# आरोग्य विभागाची नवीन इमारत जुन्या पंचायतीच्या जागेत बांधण्यात येणार

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद सावंतवाडी तालुका आरोग्य विभाग आता कात टाकणार असून अनेक वर्षे उपजिल्हा रूग्णालयात बसवलेले बस्तान आता नव्या जागेत हलविणार आहे.आरोग्य विभागाची नवीन इमारत जुन्या पंचायतीच्या जागेत बांधण्यात येणार आहे .त्यासाठी एक कोटींचा निधीही प्राप्त झाला असून निविदा प्रकिया ही पूर्ण झाली आहे. लवकरच बांधकामाला सुरूवात होणार आहे. सावंतवाडी तालुका आरोग्य विभाग हा गेली अनेक वर्षे उपजिल्हा रुग्णालयात होता. तेथूनच संपूर्ण तालुक्याचा कारभार हाकत होते.येथे सुविधांचाही अभाव होता. त्यामुळे अनेक वर्षे तालुका आरोग्य विभागाला



नव्या जागेची प्रतिक्षा होती.पण याला मुहूर्त मिळत नव्हता तसेच शासनाकडून पुरेसा निधी ही मिळत नव्हता मात्र यावर्षी तालुका आरोग्य विभाग आता स्वःताच्या जागेत जाणार आहे.या साठी एनआरएचएम मधून एक कोटिचा निधी आरोग्य विभागाला प्राप्त झाला आहे. या एक कोटी रूपया मधून ही अद्यावत अशी इमारत बांधण्यात येणार आहे.त्यासाठी लागणाऱ्या जागेचा प्रश्न ही मिटला असून सावंतवाडी पंचायत समितीची जुनी इमारत असलेल्या ठिकाणी तीन गुंठे जागा ही तालुका आरोग्य विभागाला देण्यात आली असून या जागेत अद्ययावत अशी इमारत तसेच पार्किंग ची व्यवस्था ही करण्यात आली आहे. या इमारतीचे लवकरच भूमिपूजन होणार आहे. एक कोटी रूपये एनआरएचएम कडून प्राप्त झाल्यानंतर त्यांची निविदा प्रकिया ही पूर्ण करण्यात आली आहे. त्यामुळे आता लवकरच भूमिपूजन कार्यक्रम होऊन प्रत्यक्षात कामाला सुरुवात होणार आहे. याबाबत गटविकास अधिकारी वासुदेव नाईक यांना विचारले असता त्यांनी ही तालुका आरोग्य विभागासाठी जुन्या पंचायत समिती ची इमारत परिसरातील तीन गुंठे जागा देण्यात आली असून या जागेत ही इमारत होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# ओंकार कलामंचाच्या वतीने आयोजित रिल्स स्पर्धेचे उद्या बक्षीस वितरण

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

अयोध्या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ओंकार कलामंचाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या जल्लोष रामलल्लाचा या कार्यक्रमातील महालक्ष्मी तथास्तु मॉल प्रस्तुत रिल्स् स्पर्धेचे बक्षीस वितरण उद्या ता. २८ ला सायंकाळी ४ वाजता येथील महालक्ष्मी तथास्तू मॉल मध्ये होणार आहे.

यावेळी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक ॲड. विक्रम भांगले, सावंतवाडी प्रांताधिकारी हेमंत निकम, तहसीलदार श्रीधर पाटील, मुख्याधिकारी सागर साळुंखे आदी उपस्थित राहणार आहेअयोध्या सोहळ्याचे औचित्य साधून येथील श्रीराम वाचन मंदिर समोर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वेशभुषा, रिल्स् आणि रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात रिल्स् स्पर्धेत साईश गावडे प्रथम, पार्थ सावंत द्वितीय, केतन कुलकर्णी तृतीय तर यत्वेश राऊळ यांना उत्तेजनार्थ बक्षीस जाहीर करण्यात आले होते. तर वेशभुषा स्पर्धेत काव्या गावडे प्रथम, श्रावणी आरोंदेकर आणि क्षमिका आरोंदेकर विभागून द्वितीय तर गौरव केळणेकर याला तृतीय क्रमांक जाहीर करण्यात आला होता. रांगोळी स्पर्धेत सायली भैरे प्रथम, पुर्वा चांदरकर द्वितीय, जेसिता गोम्स आणि स्वरा हरम तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. यावेळी यश संपादन करणार्या स्पर्धकांना या कार्यक्रमात गौरविण्यात येणार आहे. यावेळी सर्वानी उपस्थित रहावे, असे आवाहन ओंकार कलामंचाच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

# बांदा केंद्र शाळेत मराठी भाषा गौरव दिवस उत्साहात साजरा

**बांदा । वार्ताहर**

अमृताते पैजा जिंकू शकणारी अशी मराठी भाषा जीवनात वागण्याचे संस्कार शिकवत असते असे प्रतिपादन साहित्यिक राजेंद्र पांडुरंग गोसावी यांनी जिल्हा परिषद केंद्र शाळा बांदा नं.१येथे केले.

थोर साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त मराठीभाषा गौरव दिन बांदा केंद्र शाळेत मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला यावेळी शाळेत राबविण्यात येणाऱ्या मान्यवर आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत साहित्यिक राजेंद्र गोसावी व वाफोली येथील कवी कृष्णा जनार्दन गवस यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधला.




यावेळी विद्यार्थ्यांना कविता कशी तयार होते याची माहिती देऊन विद्यार्थ्यांना विषय देऊन त्यावर कविता तयार करून घेण्यात आल्या यावेळी शीघ्र कवी हजरजबाबीपणे उत्तर देणाऱ्या दुर्वा नाटेकर, स्वामिनी तर्पे,आर्या शिंगडे, युवराज नाईक,वेदांत वीर तसेच विविध स्पर्धात सुयश मिळवत असलेल्या सर्वज्ञ वराडकर या विद्यार्थ्यांना राजेंद्र गोसावी यांनी रोख रक्कम व आम्ही बालकवी सिंधुदुर्ग यांच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

यादिवशी विद्यार्थ्यांनी मराठी साहित्यिकांची ओळख करून दिली तसेच स्वरचित कवितांचेही गायन केले.तसेच पाठ्यपुस्तकातील सर्वच कविता पाठांतर असलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.यावेळी साहित्यिक राजेंद्र गोसावी यांनी शाळेतील दोन होतकरू विद्यार्थ्यांनींना शैक्षणिक साहित्य घेण्यासाठी आर्थिक स्वरूपात मदत केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका उर्मिला मोर्ये यांच्यासह सर्व शिक्षक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कासार्डे केंद्रावर एच.एस.सी. बोर्डाची परिक्षा अगदी उत्साहात सुरू

**कासार्डे । वार्ताहर**

कणकवली तालुक्यातील अगदी हायवे लगत असलेल्या कासार्डे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, येथे एच. एस. सी. बोर्डाची परीक्षा अगदी उत्साहात सुरू असून या परीक्षा केंद्रावर जवळ जवळ ४१५ विद्यार्थी प्रविष्ट आहेत. कासार्डे केंद्राचा क्रमांक ०८८१ असा असून अविनाश शिवराम मांजरेकर हे केंद्र संचालक म्हणून कठोर भूमिका बजावत आहेत. शिवाय केंद्रावर कोणत्याही प्रकारे अनुचित प्रकार होणार नाही याची काळजी ते सातत्याने घेत आहेत.

त्यांना साथ देण्यासाठी कासार्डे विद्यालयाचे अनिल नलवडे हे सह केंद्रसंचालक म्हणून भूमिका पार पाडत आहेत. तर दिवाकर पवार हे स्टेशनरी सुपरवायझर चे काम पाहत आहेत. पहिल्याच दिवशी परीक्षार्थी प्रतिनिधी म्हणून दिव्यांग विद्यार्थिनी कासार्डे ज्युनिअर कॉलेजची कुमारी अक्षता जाधव हिचे पुष्प देऊन कासार्डे विद्यालयाचे शिक्षण समिती चे चेअरमन अरविंद कुडतरकर यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

यावेळी कासार्डे विद्यालयाचे प्राचार्य एम. डी खाडे, केंद्र संचालक अविनाश मांजरेकर, कासार्डे विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक एन .सी. कुचेकर, प्रभारी पर्यवेक्षक एस डी. भोसले सह केंद्रसंचालक अनिल नलावडे आदी उपस्थित होते. कासार्डे केंद्रावरती तळेरे, फणसगाव, कासार्डे, मालणकर कॉलेज तळेरे व मूटाट, येथून विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी येतात. या सर्व विद्यार्थ्यांच्या डोळ्यांमध्ये भविष्यातील स्वप्न साकार करण्याचे ध्येय दिसते.

# अखेर ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग मध्ये स्त्री रोग तज्ञ हजर




**दोडामार्ग । वार्ताहर**

गेल्या एक वर्षा पासून दोडामार्ग ग्रामीण रुणालयात स्त्री रोग तज्ञ डॉक्टर नव्हते त्यामुळे महिला रुणांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत होती. त्यामुळे दोडामार्ग ग्रामीण रुणालयात स्त्री रोग तज्ञ डॉक्टर मिळावेत अशी मागणी करून देखील स्त्री रोग तज्ञ डॉक्टर देण्यास प्रशासन टाळाटाळ करत होते. मात्र काल उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या महिला आघाडी कडून उपोषण करण्यात आले होते. त्यांच्या उपोषणाला गांभिर्याने घेत अखेर आज स्त्री रोग तज्ञ डॉ.भक्ती सावंत यांची नियुक्ती झाली व डॉ.भक्ती सावंत आज रुग्णांना सेवा देण्यासाठी रुग्णालयात रुजु झाले. त्यांचे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

यावेळी उपजिल्हा संघटिका विनिता घाडी,महिला तालुका प्रमुख श्रेयाली गवस, विभाग प्रमुख जेनिफर लोबो, लोबो, उप विभागप्रमुख रेश्मा नयनी शेटकर, सपना नाईक, शिलाल फर्नांडीस, सुषमा सावंत, शीतल सावंत, जान्हवी तळणकर, कल्पिता सावंत, मौथली सावंत, प्रिया नाईक, उपजिल्हाप्रमुख बाबुराव धुरी, तालुका प्रमुख संजय गवस, युवासेना प्रमुख मदन राणे, सोशल मीडिया तालुका प्रमुख संदेश राणे,नगरसेवक चंदन गावकर, यांसह लक्ष्मण आयनोडकर, शिवराम मोर्लेकर, मिलिंद नाईक, इस्माईल चांद, सचिन केसरकर विष्णू मुंज, संदेश वरक, राजू गावडे, दशरथ मोरजकर,आदी उपस्थित होते.

# आंबा पिकावरील थ्रिप्स रोगासह विविध प्रश्नांवर आ.वैभव नाईक यांनी उठविला आवाज

**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी**

सिंधुदुर्गातील महत्वाचे पीक असलेल्या भात पिकाला शासनाने बोनस जाहीर केला आहे. मात्र शेतकऱ्यांच्या खात्यात बोनसची रक्कम जमा झाली नाही.₹/ह२₹ींश्र₹/ीश्र₹मिहाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना आमदार वैभव नाईक यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील महत्वाच्या प्रश्नांवर सभागृहात आवाज उठविला. आंबा पिकावर आलेला थ्रिप्स रोग, भात विक्रीवर शेतकऱ्यांना अद्याप बोनस मिळाला नाही. निधी अभावी प्रलंबित राहिलेली विकास कामे, गस्ती नौकेवर स्वतंत्र अधिकाऱ्यांची नेमणूक करणे, रखडलेला बाळू लिलाव या प्रश्नांकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

आ.वैभव नाईक म्हणाले, सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या महत्वाच्या आंबा पिकातून संपूर्ण राज्याला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळते. मात्र या आंबा पिकावर थ्रिप्स रोगाने थैमान घातले आहे. अनेक औषधांच्या फवारण्या केल्या तरी रोगाचे उच्चाटन होत नाही. या रोगावर कृषी विभागाने सुचविलेले औषधे देखील बोगस निघाली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याने सरकारने त्यांना अनुदान जाहीर करावे अशी मागणी आ. वैभव नाईक यांनी केली.



त्याचबरोबर सिंधुदुर्गातील महत्वाचे पीक असलेल्या भात पिकाला शासनाने बोनस जाहीर केला आहे. मात्र शेतकऱ्यांच्या खात्यात बोनसची रक्कम जमा झाली नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने लाखो कोटी रुपयांची कामे पुरवण्या मागण्यांमध्ये घेतली आहेत. परंतु प्रत्यक्षात कामे सुरु करताना १० टक्के, १५ टक्के पैसे वर्ग केले जातात. त्यामुळे याआधीची अनेक कामे रखडलेली आहेत. कामांचा आणि निधीचा ताळमेळ शासनाने राखला पाहिजे.

मत्स्य विभागाच्या अधिकाऱ्यांकडे एलईडी, पर्ससीन बोटींवर कारवाई करण्यासाठी गस्ती नौका दिल्या आहेत. मात्र या अधिकाऱ्यांकडे केंद्र शासन, राज्य शासनाच्या योजना राबविणे, परवाने व इतर सगळीच कामे त्यांच्याकडे असल्याने ते समुद्रामध्ये एलईडी, पर्ससीन बोटींवर कारवाईसाठी जाऊ शकत नाहीत. त्यामुळे कारवाई करण्यासाठी शासनाने वेगळे अधिकारी व कर्मचारी नेमले पाहिजेत.

दरवर्षी प्रमाणे वाळू धोरण जाहीर केले. परंतु सिंधुदुर्ग जिल्ह्यात अद्याप वाळूचा लिलाव झालेला नाही. अवैधरित्या वाळू वाहतूक सुरु आहे. शासनाचे अधिकारी देखील त्यांना प्रोत्साहन देत आहेत. छोटे छोटे वाळू व्यावसायिक त्यात भरडले जात आहेत. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वाळूचा लिलाव लवकरात लवकर करण्यात यावा. या सर्व मागण्यांचा विचार पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात यावा. अशी मागणी आमदार वैभव नाईक यांनी केली.

# सिंधुदुर्गात दिसणार "महिलाराज" सरपंच आरक्षण जाहीर : एकूण ४३२ ग्रामपंचायती

**ओरोस । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंच पद कोणत्या प्रवर्गासाठी राखीव आहे, याची घोषणा जिल्हाधिकारी किशोर तावडे यांनी केली आहे. त्यानुसार खुला प्रवर्ग महिलांसाठी १४१, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला ५९, अनुसूचित जाती महिला १५, अनुसूचित जमाती महिलांसाठी २ अशाप्रकारे सरपंच पद आरक्षित झाली आहे.

जिल्ह्यात नवीन कुर्ली ही ग्रामपंचायत नव्याने स्थापन झाली आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या एकूण ग्रामपंचायत संख्येत एकने वाढ होत ४३२ एवढी झाली आहे. या सर्व ग्रामपंचायातींसाठी २०२५ पर्यंत होणाऱ्या सरपंच निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी तावडे यांनी तालुकानिहाय प्रवर्गनिहाय आरक्षित संख्या निश्चित केली आहे. जिल्ह्याच्या ४३२ ग्रामपंचायतीसाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील खुल्या गटासाठी १५ तर महिलांसाठी १५ अशाप्रकारे आरक्षण राहिले आहे. अनुसूचित जमाती यासाठी खुल्या प्रवर्गाला दोन तर महिलांसाठी दोन जागा निश्चित झाल्या आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्गातील खुल्या गटासाठी ५८ तर महिलांसाठी ५९ सरपंच पदे आरक्षित झाली आहेत. तसेच खुल्या प्रवर्गातील खुल्या गटासाठी १४० तर महिलांसाठी १४१ पदे आरक्षित झाली आहेत. याच प्रमाणे जिल्ह्याच्या आरक्षणानुसर तालुक्याचे आरक्षण सुद्धा निश्चित करण्यात आले आहे. तालुक्याला ठरवून दिलेल्या कोट्याप्रमाणे तालुक्यातील एकूण सरपंच पदांचे आरक्षण राखणे आवश्यक आहे. २०२५ पर्यंत होणाऱ्या निवडणुकांसाठी हे आरक्षण राहणार आहे.

**नवीन कुर्ली ग्रामपंचायतची पहिलीच निवडणूक**

कणकवली तालुक्यात नवीन कुर्ली या ग्रामपंचायतीची नव्याने स्थापना झाली आहे. सध्या या ग्रामपंचायतीवर प्रशासक कार्यरत आहे. लवकरच या ग्राम पंचायतीची पहिली निवडणूक होणार आहे. या ग्रामपंचायतीवर पहिला सरपंच होण्याचा मान तेथील नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलेला मिळणार आहे. येथील सरपंच पद नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला यांच्यासाठी आरक्षित झाले आहे.

# कोकण भूमी प्रकल्प ग्रस्त कृती समितीचे उपोषण भाजप पदाधिकाऱ्यांच्या शिष्टाई मुळे तूर्तास स्थगित

**मुंबई । प्रतिनिधी**

कोकण भूमी प्रकल्प ग्रस्त कृती समितीचे उपोषण भाजप पदाधिकाऱ्यांच्या शिष्टाई मुळे तूर्तास स्थगित करण्यात आले आहे. भाजप तालुका अध्यक्ष दादा दळवी व भाजपा जिल्हा सरचिटणीस सतेज नलावडे यांनी मध्यस्थीची भूमिका पार पाडली. याबाबत सविस्तर वृत्त असे की कोकण भूमी प्रकल्प ग्रस्त कृती समिती गेले अनेक वर्षे रेल्वे प्रसासनावर आपल्या न्याय हक्कासाठी झगडते आहे, परंतु रेल्वे प्रशासनाने कधी हा विषय गांभीर्याने पाहिला नाही अखेर आज सुमारे शंभर पेक्षा जास्त प्रकल्प ग्रस्तानी रेल्वे स्टेशन च्या आवारात आमरण उपोषणाला बसले. या वेळी दुपार नंतर भाजप तालुका अध्यक्ष दादा दळवी व जिल्हा सरचिटणीस सतेज नलावडे यांनी उपोषण ठिकाणी भेट दिली, या वेळी रेल्वेचे रिजनल मॅनेजर कांबळे साहेब हे देखील त्या ठिकाणी आले..




तर भाजप नेते बाळासाहेब माने, जिल्हा अध्यक्ष राजेश सावंत यांना दूरध्वनी वरून संपर्क केला. त्यांनी देखील केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री राव साहेब दानवे यांच्याशी संपर्क करून या मध्ये मार्ग काढण्याची विनंती करतो असे सांगितले. शेवटी रिजनल मॅनेजर कांबळे साहेब यांनी उपोषण कर्त्यांना सांगितले की आपल्या मागण्या रास्त आहेत मला आपल्या प्रती सहानुभूती आहे, मी या विषयात बेलापूरच्या वरिष्ठ कार्यलयाशी संपर्क करून आपणा सोबत येत्या ८ दिवसात बैठक लावतो. व आत्ता उपोषण मागे घ्या अशी विनंती केली. त्यावर प्रकल्प ग्रस्थांनी आपली पुढील होणाऱ्या बैठकीच्या आश्वासनावर आजचे उपोषण मागे घेतले. यावेळी तालुका अध्यक्ष दादा दळवी यांनी उपोषण कर्त्यांना लिंबू पाणी देऊन उपोषण सोडल्याची घोषणा केली.

# कासार्डे विजयदुर्ग रस्ता दुपदरी सिमेंट काँक्रिटचा होणार

**देवगड । पांडूशेठ साटम**

विजयदुर्ग ते कासार्डे हा देवगड तालुक्यातील आणि कणकवली विधानसभा मतदार संघातील महत्वाचा रस्ता आमदार नितेश राणे यांच्या प्रयत्नातून दुपदरी व सिमेंट काँक्रिटचा होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विजयदुर्ग किल्ल्याला हा जोडणारा देवगड तालुक्यातील अंत्यंत महत्त्वाचा रस्ता आहे. ४१२ कोटी रुपये बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री रविन्द्र चव्हाण यांनी महायुती सरकारच्या माध्यमातून मंजूर केले आहेत. या रस्त्याच्या मंजुरीमुळे जनतेतून समाधान व्यक्त केले जात आहे. या रस्त्याची लांबी ५२ कि.मी. आहे. या रस्त्याचा समावेश एडीबी योजनेमधुन समावेश झालास असुन या रस्त्याला ४१२ कोटी रुपयांची मंजुरी राज्य शासनाकडुन मिळालेली आहे. हा रस्ता दुपदरी होणार असुन हा रस्ता पुर्णतः क्रॉकीटचा होणार आहे. २४२ पाईप मोऱ्या जुन्या सर्व काढुन नव्याने बांधण्यात येणार आहेत तसेच या रस्त्यावरील सर्व सात पुल तोडुन नव्याने १२ मीटर रुंदीने करण्यात येणार आहेत.